दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२७ | शनिवार दि.०७ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

ग्रे मार्केटचा मायाजाल: अनधिकृत सट्टेबाजी आणि सामान्य गुंतवणूकदारांचा बळी

भारतीय शेअर बाजारात आयपीओची हवा सध्या जोरात आहे. नवी कंपनी बाजारात सूचीबद्ध होणार म्हटली की, गुंतवणूकदारांमध्ये एकच उत्सुकता पाहायला मिळते. परंतु, या उत्साहाच्या आड एक समांतर आणि अनधिकृत बाजारपेठ वेगाने फोफावत आहे, ती म्हणजे 'आयपीओ ग्रे मार्केट'. कोणतीही अधिकृत वेबसाईट नाही, सेबीची मान्यता नाही, ना डिमॅट खात्यात शेअर्सची देवाणघेवाण! संपूर्ण व्यवहार केवळ व्हॉट्सप आणि टेलिग्रामच्या गुप्त ग्रुप्सवर चालतात. सामान्य गुंतवणूकदारांच्या भावनांशी खेळून ऑपरेटर एका रात्रीत करोडपती होतात, तर दुसरीकडे अज्ञानापोटी गुंतवणूक करणारा सर्वसामान्य नागरिक कंगाल होतो. या मायाजालावर वेळीच अंकुश लावण्याची गरज निर्माण झाली आहे.३

थोडक्यात...

कॅब चालकाने कुटुंबातील ७ जणांची केली हत्या

बंगळुरू : बंगळुरूमध्ये एकाच कुटुंबातील सात जणांची हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. एका कॅब चालकाने कौटुंबिक वादातून स्वत:च्या पत्नी, सासू, मेव्हणे, मेहुणी आणि एका सात वर्षांच्या मुलाची हत्या केल्याचा आरोप आहे. इंदुशेखर असे आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे. आरोपीने सात जणांची हत्या केल्याची कबुली दिल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, पोलिसांना एका सात वर्षांच्या मुलाचा मृतदेह सापडला असून, इतर सहा जणांचे मृतदेह शोधण्याचे काम सुरू आहे. प्राथमिक तपासात या हत्यांमागे कौटुंबिक वाद असल्याचे समोर आले आहे. आरोपी इंदुशेखर हा पत्नी सुनीता हिच्या माहेरच्या लोकांशी असलेल्या जवळच्या संबंधांमुळे नाराज होता. याच कारणावरून पती-पत्नीमध्ये वारंवार वाद होत असल्याची माहिती समोर आली आहे.

सोलापूर-पुणे महामार्गावर भीषण अपघात; तिघांचा मृत्यू

सोलापूर : सोलापूर-पुणे महामार्गावर मोहोळ तालुक्यातील शेटफळ गावच्या हद्दीत ईर्टिगा कार आणि कंटेनर यांच्यात भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत आठ वर्षांच्या चिमुरड्यासह तिघांचा मृत्यू झाला, तर अन्य दोघे जखमी झाले आहेत. शुक्रवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास तेलंगवाडी ते शेटफळ दरम्यान ही घटना घडली. या अपघातात पार्थ तुषार भारंबे (वय ८), विलास चांगू भारंबे (वय ६६) आणि शोभा विलास भारंबे (वय ६३, तिघेही रा. कल्याण) यांचा मृत्यू झाला. एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ईर्टिगा कार सोलापूर-पुणे महामार्गावरून प्रवास करत असताना शेटफळ गावच्या हद्दीत कार आणि कंटेनर यांची जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, तिघांचा जागीच मृत्यू झाला. कारमधील अन्य दोघे जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या दुर्घटनेमुळे महामार्गावरील वाहतुकीवरही परिणाम झाला.

महाराष्ट्रसह ७ राज्यांतील मतदारांना नाव नोंदणीची आणखी एक संधी!

मुंबई : विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेदरम्यान अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार म्हणून चिन्हांकित झालेल्या किंवा ज्यांचे प्रगणक अर्ज वितरीत होऊनही वेळेत परत मिळाले नाहीत, अशा मतदारांना केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्रवारी एक मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे.

प्रारूप मतदार यादीतून वगळल्या गेलेल्या या मतदारांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आणखी एक संधी देण्यात आली आहे. हा नवा आदेश दिल्ली, महाराष्ट्र, हरयाणा, आंध्र प्रदेश, झारखंड, तेलंगणा आणि नागालँड या सात राज्यांमधील मतदारांसाठी लागू असणार आहे. निवडणूक आयोगाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना एका विशेष देखरेख यंत्रणेची उभारणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या यंत्रणेमुळे कोणत्याही पात्र मतदाराचे नाव अंतिम मतदार यादीतून सुटणार नाही, याची काळजी घेतली जाईल; तसेच दुबार नाव नोंदणी रोखण्यासही मदत होईल.

दुष्काळग्रस्त ८७.४५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ४,३७२ कोटींची दिवाळी मदत

५ नोव्हेंबरअखेर ८७ लाख शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजारांचे वाटप; उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही लवकरच मिळणार लाभ

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक आधार देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या पाच हजार रुपयांच्या दिवाळी अग्रीम मदतीचे आतापर्यंत ४ हजार ३७२ कोटी ८३ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत. ५ नोव्हेंबर २०२६ अखेर राज्यातील ८७ लाख ४५ हजार ६६९ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत ही रक्कम जमा झाली आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांनाही मदत देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये दिवाळी अग्रीम देण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार महसूल, मदत व पुनर्वसन आणि कृषी विभागाच्या यंत्रणेमार्फत मदत वितरणाची प्रक्रिया युद्धपातळीवर राबविण्यात आली. थेट बँक खात्यांमध्ये मदतीची रक्कम जमा करण्यात आली असून, आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचे वितरण पूर्ण झाले आहे. दरम्यान, काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यांशी संबंधित तांत्रिक अडचणी, खाते क्रमांकातील त्रुटी तसेच अन्य कारणांमुळे मदतीची रक्कम जमा होऊ शकलेली नाही. अशा शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करून त्यांनाही मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे. राज्यातील एकही पात्र शेतकरी या मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. दिवाळी अग्रीम मदतीच्या वितरणावर शासनाकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, तांत्रिक अडचणी दूर होताच उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांतही मदतीची रक्कम जमा केली जाणार असल्याचे मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केले.

सत्तेसाठी भाजप कोणत्याही थराला जाणार?

गोकुळमध्ये बहुमताचा कौल धुडकावून चार मताधिकारप्राप्त अशासकीय संचालकांची अखेर नियुक्ती; राज्यपालांची अध्यादेशावर स्वाक्षरी, सतेज पाटील यांचा विरोध डावलला!



मुंबई । प्रतिनिधी

सहकार क्षेत्रातील लोकशाहीचा कौल मान्य करण्याऐवजी सत्तेच्या जोरावर संस्थांचा ताबा मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा सवाल गोकुळच्या निमित्ताने उपस्थित झाला आहे. कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळमध्ये सतेज पाटील यांच्या आघाडीने १३ संचालकांचे बहुमत मिळविले असताना आता राज्य सरकारने मताधिकार असलेले चार अशासकीय संचालक नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील अध्यादेशावर राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी स्वाक्षरी केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. त्यामुळे गोकुळमधील सत्तासमीकरण बदलण्याचा सरकारचा मार्ग मोकळा झाला आहे. बहुमताचा कौल विरोधात गेल्यानंतर सत्तेच्या माध्यमातून समीकरणे बदलण्याचा हा प्रयत्न म्हणजे भाजप आणि महायुती सत्तेसाठी कोणत्याही ◀◀ पान २ वर

९ नोव्हेंबरला संघर्ष मोर्चा; १० तारखेच्या अध्यक्ष निवडीकडे लक्ष

या निर्णयाविरोधात सतेज पाटील यांनी ९ नोव्हेंबरला कोल्हापुरात संघर्ष मोर्चाचे आयोजन केले आहे. दरम्यान, १० नोव्हेंबरपूर्वी अशासकीय संचालकांच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यानंतर होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडीत नेमके काय घडणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. बहुमताचा कौल टिकविण्यासाठी सतेज पाटील कोणती भूमिका घेतात आणि सरकारच्या निर्णयाला कायदेशीर अथवा राजकीय पातळीवर कसे आव्हान देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गोकुळचा संघर्ष आता केवळ अध्यक्षपदाच्या निवडीपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो सहकारातील लोकशाही, सभासदांचा कौल आणि सत्ताधाऱ्यांच्या हस्तक्षेपाचा प्रश्न बनला आहे.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार ?

येत्या १० तारखेला मनोमिलन; शशिकांत शिंदेंचा खळबळजनक दावा

नवी मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीचे संकेत मिळत असून, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आल्याची चर्चा रंगली आहे. येत्या १० तारखेला दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत मोठा निर्णय होण्याची शक्यता असून, त्या दिवशी सर्व चित्र स्पष्ट होईल, असा खळबळजनक दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केला आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



नवी मुंबई येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या विलीनीकरणाबाबत आणि दोन्ही गटांतील अंतर्गत घडामोडींवर सविस्तर भाष्य केले. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना ते म्हणाले, ''आम्ही सुरुवातीपासूनच सांगत होतो की दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येतील. यापूर्वी १२ फेब्रुवारी रोजीच दोन्ही पक्ष एकत्र येण्याचे निश्चित झाले होते. मात्र, दुर्दैवाने त्याच काळात अजित पवार यांचे निधन झाले आणि ती प्रक्रिया थांबली. जर त्यावेळी दोन्ही पक्ष एकत्र आले असते, तर आज महाराष्ट्राचे राजकीय चित्र पूर्णपणे वेगळे दिसले असते.'' पुढे बोलताना शिंदे यांनी स्पष्ट केले की, ''ज्येष्ठ नेते शरद ◀◀ पान २ वर

मतदान ओळखपत्र पाहून मिळणार योजनांचा लाभ



दिल्ली । वृत्तसंस्था

काँग्रेस खासदार आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवरून एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. हा व्हिडिओ भाजपचे केंद्रीय मंत्री लल्लन सिंह यांचा आहे. या आधारे त्यांनी आता सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांना आधार कार्ड नाही तर मतदान कार्ड पाहून योजनांचा लाभ मिळणार आहे असा दावा केला.

राहुल गांधी यांनी हा दावा थेट मतदार यादीतून नावे कमी करणे आणि मत चोरीशी जोडला आहे. त्यांनी केंद्र सरकारवर टीका करत आता हे सरकार लोकांचा हक्क देखील हिसकावून घेत आहे असा आरोप केला. राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत म्हटले की, आता मोदी सरकारमधील मंत्र्यांनी कल्याणकारी योजनांचा फायदा आधार कार्डच्या आधारे मिळणार नाही तर मतदान ओळख पत्राच्या आधारे मिळणार आहे जाहीर केले आहे. राहुल गांधी पोस्टमध्ये लिहितात, 'षडयंत्र तर खूप मोठं आहे. ◀◀ पान २ वर

बनावट क्रीडा प्रमाणपत्रांचा पर्दाफाश करणाऱ्या वैभव चव्हाणचा संशयास्पद मृत्यू

बीड । प्रतिनिधी

बनावट क्रीडा प्रमाणपत्रे तयार करून खेळाडू असल्याचे भासवून सरकारी नोकऱ्या लाटणारे रॅकेट उघडकीस आणणाऱ्या वैभव चव्हाण याचा संशयास्पद स्थितीत मृत्यू झाला आहे. बीड जिल्ह्यातील नवगण राजुरी येथील रहिवासी असलेल्या वैभव चव्हाणचा मृतदेह इमामपूर शिवारात सापडला होता. दरम्यान, वैभवचा मृत्यू हा घातपात असल्याचा आरोप करत त्याच्या कुटुंबीयांनी या प्रकरणी चौकशीची मागणी केली आहे.



याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार वैभव हा दोन वर्षांपूर्वी पोलिस खात्यात भरती झाला होता. मात्र त्याच वेळी वैभव एवढेच गुण असलेल्या अन्य एकाने क्रीडापटू असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्याने त्याची निवड करण्यात आली. तर वैभवची संधी हुकली होती. या प्रकारानंतर वैभवने सरकारी नोकरभरतीसाठी बनावट क्रीडा प्रमाणपत्रे तयार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला होता. वैभव हा उत्तम कराटेपटू होता. मात्र त्याचा स्पर्धक असलेल्या उमेदवाराने बनावट प्रमाणपत्र सादर केल्याने वैभवची संधी हुकली होती. याचा परिणाम ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०५ नोव्हेंब २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू:६.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,९०१	३,८०१	३,२९५

ज्वारी/हायब्रिड : १४.५० क्विंटल

२,३१४	५,०००	४,३०६

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : ५.००क्विंटल

७,४००	९,८००	८,७३३

उडीद :१.५० क्विंटल

८,९८१	८,९८१	८,९८१

बाजरी: १.०० क्विंटल

३,२००	३,२००	३,२००

मुग: २.०० क्विंटल

९,२००	९,३०१	९,२५०

सोयाबीन: २.५० क्विंटल

६,७००	६,७००	६,७००

हरभरा: ४.५० क्विंटल

५,८००	७,१५०	६,५१३

भडक रंगांची मिठाई खरेदी करू नका, चांदीचा वर्खही तपासा

तुकाराम मुंढेंचा ग्राहकांना सावधानतेचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

दिवाळी म्हटलं की घराघरांत फराळाचा सुगंध, मिठाईची रेलचेल आणि नातेवाइकांना गोडधोड देण्याची लगबग सुरू होते. सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी बाजारपेठांमध्ये पेढे, बर्फी, काजू कतली, गुलाबजाम, रसगुल्ले आणि खव्याच्या मिठाईची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाते. मात्र, याच सणासुदीच्या गर्दीत ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोरांचंही फावतं.



मिठाईला आकर्षक दिसण्यासाठी वापरले जाणारे कृत्रिम ◀◀ पान २ वर


एसटीच्या सवलतींसाठी एनसीएमसी कार्डची सक्ती १ जानेवारीपर्यंत स्थगित!

मुंबई । प्रतिनिधी

एसटी महामंडळाच्या लालपरीतून प्रवास करणाऱ्या राज्यातील लाखो महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. एसटी प्रवासातील सवलतींचा लाभ घेण्यासाठी अनिवार्य करण्यात आलेल्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डची (एनसीएमसी) सक्ती आता १ जानेवारी २०२७ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या निर्णयाची घोषणा केली.

एसटी प्रवासातील सवलतींसाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक महिला व ज्येष्ठ नागरिकांपर्यंत या मोहिमेची माहिती पोहोचली नसल्याने मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी कार्ड नोंदणीपासून ◀◀ पान २ वर





अमिताभ बच्चन यांच्या 'जलसा' बंगल्याला बॉम्बने उडवण्याची धमकी; मुंबईत खळबळ, पोलीस अलर्ट

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईतून एक मोठी बातमी समोर आली आहे. ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या जुहू येथील 'जलसा' या बंगल्याला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. या धमकीमुळे मुंबईत खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई उच्च न्यायालयाला एक धमकीचा ई-मेल प्राप्त झाला आहे. या ई-मेलमध्ये मुंबई उच्च न्यायालयासह मुंबई शेअर बाजार, वरळी रेसकोर्स आणि अमिताभ बच्चन यांच्या 'जलसा' बंगल्याला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. धमकीचा ई-मेल मिळताच मुंबई पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. पोलीस आणि संबंधित सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून, धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. ई-मेल नेमका कुठून पाठवण्यात आला आणि त्यामागे कोणाचा हात आहे, याचाही तपास केला जात आहे. काही दिवसांपूर्वी बॉलिवूड अभिनेता आयुष्मान खुराना आणि ◀◀ पान २ वर

अग्रलेख

ग्रे मार्केटचा मायाजाल: अनधिकृत सट्टेबाजी आणि सामान्य गुंतवणूकदारांचा बळी

भारतीय शेअर बाजारात आयपीओची हवा सध्या जोरात आहे. नवी कंपनी बाजारात सूचीबद्ध होणार म्हटली की, गुंतवणूकदारांमध्ये एकच उत्सुकता पाहायला मिळते. परंतु, या उत्साहाच्या आड एक समांतर आणि अनधिकृत बाजारपेठ वेगाने फोफावत आहे, ती म्हणजे 'आयपीओ ग्रे मार्केट'. कोणतीही अधिकृत वेबसाईट नाही, सेबीची मान्यता नाही, ना डिमॅट खात्यात शेअर्सची देवाणघेवाण! संपूर्ण व्यवहार केवळ व्हॉट्सप आणि टेलिग्रामच्या गुप्त ग्रुप्सवर चालतात. सामान्य गुंतवणूकदारांच्या भावनांशी खेळून ऑपरेटर एका रात्रीत करोडपती होतात, तर दुसरीकडे अज्ञानापोटी गुंतवणूक करणारा सर्वसामान्य नागरिक कंगाल होतो. या मायाजालावर वेळीच अंकुश लावण्याची गरज निर्माण झाली आहे.

ग्रे मार्केट म्हणजे कायदेशीर आणि बेकायदेशीर यातील अनधिकृत बाजार. कंपनीचा आयपीओ बाजारात येण्यापूर्वीच या बाजारात शेअर्सची खरेदी-विक्री सुरू होते. उदा. १०० मूळ किंमत असलेल्या आयपीओला ग्रे मार्केटमध्ये ५० चा प्रीमियम मिळत असेल, तर तो शेअर १५० वर लिस्ट होईल असा अंदाज बांधला जातो. यात 'कोस्टक' आणि 'सौदा पत्र' या अनधिकृत मार्गांनी अर्जांची किंवा मिळणाऱ्या शेअर्सची बोली लावली जाते. हा सगळा सट्टा केवळ विश्वासावर चालतो. ऑपरेटर पळून गेला, तर गुंतवणूकदाराला एक रुपयाही परत मिळण्याची कायदेशीर सोय नसते. पूर्वी बंद खोल्यांमध्ये चालणारा हा खेळ आता व्हॉट्सप आणि टेलिग्रामवर पसरला आहे. ऑपरेटर कृत्रिम मागणी निर्माण करून जीएमपी फुगवतात. सोशल मीडियावर 'जीएमपी ८०% पार' अशा बातम्या पसरवून 'फियर ऑफ मिसिंग आऊट' ची लाट निर्माण केली जाते. लिस्टिंगच्या दिवशी जेव्हा प्रत्यक्ष बाजारात फुगा फुटतो, तेव्हा ऑपरेटर नफा कमावून बाजूला होतात आणि किरकोळ गुंतवणूकदार अडकून पडतात.

इतिहासाकडे नजर टाकल्यास या सट्टेबाजीचे गंभीर परिणाम स्पष्ट दिसतात. जानेवारी २००८ मधील रिलायन्स पॉवरचा आयपीओ हे याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. १५ ते १८ जानेवारी २००८ दरम्यान आलेल्या या ४५० च्या आयपीओ साठी ग्रे मार्केटमध्ये ३८० हून अधिक (८०% पेक्षा जास्त) जीएमपी दाखवला गेला. लोकांच्या उड्या पडल्या आणि आयपीओ तब्बल ७० पट सबस्क्राईब झाला. मात्र, ११ फेब्रुवारी २००८ रोजी लिस्टिंगच्या दिवशी शेअर ५३० वर उघडून काही तासांतच कोसळला आणि ३७२.३० वर बंद झाला (१७% हून अधिक तोटा). एका दिवसात लाखो किरकोळ गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये स्वाहा झाले होते.

भारतात सिस्टीममधील त्रुटींचा फायदा घेऊन बाजार मॅनिप्युलेट करण्याचा इतिहास जुना आहे. १९८८ ते १९९२ दरम्यान हर्षद मेहताने 'रेडी फॉरवर्ड डील्स' आणि खोट्या बँक रिसिट्सचा गैरवापर करून बँकांचा जवळपास ५,००० कोटींचा निधी बेकायदेशीरपणे शेअर बाजारात वळवला. '-एसीसी' सारखा शेअर २०० वरून थेट ९,००० वर फुगवला गेला. एप्रिल १९९२ मध्ये सुचेता दलाल यांनी या घोटाळ्याचा पर्दाफाश केला आणि सेन्सेक्स ४५०० वरून २५०० वर कोसळला. तसेच, २००९ ते २०१८ दरम्यान युनायटेड ब्रुअरीज, कार्लसबर्ग आणि एबी इनबेव्ह या कंपन्यांनी 'बिअर कार्टेल' बनवून किमती कृत्रिमरीत्या वाढवल्या. सप्टेंबर २०२१ मध्ये 'कंपिटिशन कमिशन ऑफ इंडिया'ने त्यांच्यावर ८७३ कोटींहून अधिकचा दंड ठोठावला. दारूचा बाजार असो वा शेअर बाजार, पारदर्शकता नसेल तिथे कार्टेल सामान्य माणसाची लूट करतात. या समस्येवर पूर्ण बंदी घालणे कठीण असले तरी सेबीने 'व्हेन-लिस्टेड ट्रेडिंग प्लॅटफॉर्मचा प्रस्ताव मांडला आहे. अलॉटमेंटनंतर आणि प्रत्यक्ष लिस्टिंगपूर्वी कायदेशीर ट्रेडिंगची परवानगी दिल्यास किमतींची पारदर्शक शोधप्रक्रिया होईल आणि अनधिकृत ऑपरेटर्सचा प्रभाव संपेल.

शेवटी, ग्रे मार्केट प्रीमियम हा कंपनीच्या चांगल्या वा वाईट असण्याचा पुरावा नाही. तो केवळ ऑपरेटरचा सट्टा असू शकतो. केवळ ऋचझ पाहून गुंतवणूक करणाऱ्यांनी २००८ चा धडा लक्षात ठेवला पाहिजे. कंपनीचे फायनान्शियल्स आणि फंडामेंटल्स अभ्यासूनच निर्णय घ्यावा. बाजारातील अंधळा सट्टा हा नफा नव्हे, तर विनाशाचे आमंत्रण ठरतो!

पान १ वरून...

बनावट क्रीडा प्रमाणपत्रांचा

म्हणून राज्यभरातील १४ पोलिस कर्मचाऱ्यांसह काही क्रीडा अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली होती. एवढेच नाही तर बनावट क्रीडा प्रमाणपत्र देणाऱ्या कुराश संघटनेच्या अध्यक्ष आणि सचिवांना सप्टेंबर महिन्यात पुणे गुन्हे शाखेने अटक केली होती. तसेच ही कारवाई झाल्यापासून वैभवला जिवे मारण्याच्या धमक्या येत होता. तसेच या संदर्भातील वैभव चव्हाणने रेकॉर्ड करून ठेवलेला ऑडियो समोर आला असून त्यात आपले काही बरंवाईट झाल्यास कुराश संघटनेला जबाबदार धरण्यात यावे, असे वैभव सांगताना दिसत आहे. मात्र या ऑडियो क्लिपला अद्याप दुजोरा मिळू शकलेला नाही. दरम्यान, वैभव चव्हाण याचा मृतदेह इमामपूर येथे एका झाडाला लटकलेल्या स्थितीत सापडल्याने खळबळ उडाली. वैभवच्या मृतदेहाचे पोस्टमार्टेम करण्यात आले असता त्याच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा सापडल्या आहेत. तसेच वैभवचे कुटुंबही हा घातपात असल्याचा दावा करत असल्याने या संपूर्ण प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. यादरम्यान, वैभवच्या मृत्यूसाठी कारणीभूत असलेल्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी त्याच्या नातेवाईकांनी तीव्र आंदोलन केले. दरम्यान, शवविच्छेदन अहवालानुसार गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिल्यानंतर नातेवाईकांकडून वैभवच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार

पवार आणि अजित पवार यांच्यामध्ये अत्यंत घट्ट भावनिक नाते होते. त्यामुळे दोन्ही पक्षांनी पुन्हा एकत्र यावे, ही त्या दोघांचीही मनापासून इच्छा होती. आज सुनील तटकरे यांच्या विधानामुळे आम्ही सातत्याने करत असलेल्या दाव्यावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे.'' दरम्यान, या संभाव्य विलीनीकरणाच्या दृष्टीने वरिष्ठ पातळीवर बैठकांचे सत्र सुरू असल्याचेही त्यांनी सूचित केले. ''खासदार प्रफुल्ल पटेल यांनी नुकतीच शरद पवार यांची भेट घेतली असून, येत्या १० तारखेला पुन्हा एकदा दोन्ही नेत्यांमध्ये महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत अंतिम निर्णय घेतला जाईल आणि १० तारखेला जे काही ठरेल ते अधिकृतपणे सर्वांसमोर येईल,'' अशी माहितीही शशिकांत शिंदे यांनी दिली. गेल्या काही काळापासून दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांवर प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या या अधिकृत वक्तव्यामुळे शिक्कामोर्तब झाल्याचे मानले जात असून, येत्या १० तारखेला होणाऱ्या घडामोडींकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

सत्तेसाठी भाजप कोणत्याही

थराला जाऊ शकते, याचे उदाहरण असल्याची टीका विरोधकांकडून होत आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत गोकुळवर चार मताधिकारप्राप्त अशासकीय संचालक नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर संबंधित फाईल राज्यपालांकडे पाठविण्यात आली. आता राज्यपालांनी अध्यादेशावर स्वाक्षरी केल्याने सहकार विभागाकडून पुढील प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. विधी व न्याय विभागाच्या प्रक्रियेनंतर अध्यादेश अधिकृतपणे जारी होण्याची शक्यता आहे. सरकारच्या या निर्णयामुळे गोकुळमध्ये आणखी पाच संचालकांची नियुक्ती होणार असून, त्यापैकी चार जणांना मतदानाचा अधिकार असेल. विशेष म्हणजे, गोकुळच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या आघाडीने १३ जागांसह बहुमत मिळविले होते, तर मंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या आघाडीला १२ जागा मिळाल्या होत्या. लोकशाही प्रक्रियेत सभासदांनी दिलेला हा कौल असताना आता सरकारकडून नियुक्त संचालकांच्या माध्यमातून सत्तेचे गणित बदलण्याची तयारी सुरू झाली आहे. अध्यक्ष निवडीसाठी १४ संचालकांची उपस्थिती आवश्यक असल्याने नव्या नियुक्त्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सरकारच्या या खेळीमुळे महायुतीला गोकुळच्या सत्तेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो. सरकारच्या या निर्णयाला केवळ सतेज पाटील यांनीच विरोध केला नाही, तर काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना, मनसे आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही आक्षेप घेतला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते बच्चू कडू यांनीदेखील सरकारचा निर्णय चुकीचा असल्याची भूमिका मांडली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही सोशल मीडियावर पोस्ट करून या प्रकरणाची दखल घेतली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विरोध होत असतानाही सरकारने निर्णय मागे न घेता अध्यादेशाचा मार्ग स्वीकारल्याने राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. सतेज पाटील यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा अभिप्राय घेऊन तो राज्य सरकारकडे पाठविला होता. मात्र, सरकारने त्यानंतरही आपली भूमिका कायम ठेवली. त्यामुळे सहकारी संस्थांमधील निवडणूक प्रक्रियेत सभासदांनी दिलेल्या मतांना किती महत्त्व उरले आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. निवडणुकीत बहुमत मिळविणाऱ्या आघाडीचे सत्तास्थान नियुक्त्यांच्या माध्यमातून बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.

मतदान ओळखपत्र पाहून

तुम्ही शांतपणे हे समजून घ्या. एसआयआरच्या नावावर करोडो लोकांची नावे मतदार यादीतून कापली जात आहेत. जर हे थांबवलं गेलं नाही तर तुमचे देखील नाव कमी केलं जाऊ शकतं. प्रामुख्याने कमी केलेली नावे कोणती आहेत? भाजपविरूद्ध आक्रोश करणाऱ्यांची आहेत. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी मतदारांची यादी ही एका निष्पक्ष निवडणूक आयोगाच्या हातात असली पाहिजे. मात्र ही यादी सरकारचे कर्मचारी ज्ञानेश कुमार यांच्या हातात आहे. राहुल गांधी यांनी या मुद्द्यावर सरकारी योजानांशी जोडले अन् चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी जर वोटर लिस्टमध्ये नाव नसले तर लोकांना योजनांचा लाभ मिळण्यास अडचण निर्माण होऊ शकते. आज पंचायत राजच्या योजनांसाठी मतदान ओळख पत्र सक्तीचं केलं जात आहे. उद्या रेशन, पेन्शन, मनरेगा, घरकुल, शिष्यवृत्ती आणि आरक्षण यासाठी देखील ही अट लागू होईल. राहुल गांधी म्हणाले, जर कोणी भाजपला हटवण्याचा निर्णय घेतला तर त्यांची नावे मतदार यादीतून कट केली जाऊ शकतात. राहुल गांधी यांनी ही फक्त मत चोरी नाही तर अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले.

भडक रंगांची मिठाई खरेदी

रंग, निकृष्ट दर्जाचा खवा आणि बनावट चांदीचा वर्ख यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे यंदा दिवाळीचा गोडवा चाखण्यापूर्वीच सावध व्हा.

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नागरिकांना मिठाई आणि खवा खरेदी करताना विशेष खबरदारी घेण्याचं आवाहन केलं आहे. विशेष म्हणजे, दोन-तीन दिवसांपेक्षा अधिक काळ दुकानात ठेवलेली खव्याची मिठाई खरेदी करू नका, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे.

दुसरीकडे, भेसळ आणि अन्नसुरक्षा नियमांचं उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांविरोधात राज्यभरात धडक मोहीम राबवली असून, तब्बल ९५४ अन्न व्यावसायिकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. कोट्यवधी रुपयांचा अन्नसाठा जप्त झाल्याने मिठाई विक्रेत्यांमध्येही खळबळ उडाली आहे. नागरिकांनी गरजेपुरतीच मिठाई खरेदी करावी. दुकानात अनेक दिवसांपासून ठेवलेली मिठाई किंवा दोन-तीन दिवसांपेक्षा जुनी खव्याची मिठाई घेणं टाळावं. शक्यतो नामांकित आणि अधिकृत परवाना असलेल्या दुकानांमधूनच मिठाई खरेदी करावी. मिठाई किंवा खव्याच्या पाकिटावर उत्पादनाची तारीख, मुदत आणि आवश्यक माहिती असलेलं लेबल आहे की नाही, हे तपासून घ्यावं. एखाद्या दुकानात भेसळयुक्त पदार्थ विकले जात असल्याचा संशय आल्यास ऋऊ-कडे तक्रार करावी. तक्रारींची दखल घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल, असं मुंढे यांनी स्पष्ट केलं आहे. मिठाईवर चांदी किंवा सोन्याचा वर्ख लावलेला असल्यास त्याच्या गुणवत्तेकडेही लक्ष द्यावं. चांदीच्या वर्खाच्या नावाखाली काही ठिकाणी ॲल्युमिनियम फॉईलचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी आहेत. मुंढे यांनी सांगितलेल्या प्राथमिक तपासणीच्या सूचनेनुसार, चांदीचा वर्ख हाताने घासल्यावर तो विरघळून किंवा नाहीसा होतो; मात्र त्याची वेगळी पातळ फॉईल तयार होत असेल तर तो ॲल्युमिनियम असण्याची शक्यता आहे. मात्र केवळ या चाचणीवरून वर्ख अस्सल असल्याचा अंतिम निष्कर्ष काढता येत नाही. त्यासाठी प्रयोगशाळेतील तपासणी महत्त्वाची आहे.

अमिताभ बच्चन यांच्या

तुषार कपूर यांनाही बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली होती. आयुष्मान खुराना यांना धमकी दिल्याप्रकरणी मुंबई क्राइम ब्रँचने बेंगळुरूमधून एका आरोपीला अटक केली होती. विशेष म्हणजे, हा आरोपी व्यवसायाने आयटी इंजिनिअर असल्याची माहिती समोर आली होती. दुसरीकडे, तुषार कपूर यांना मिळालेल्या धमकीच्या प्रकरणाचाही पोलिसांनी सखोल तपास केला होता. दरम्यान, अभिनेता टायगर श्रॉफवर जीवघेणा हल्ला झाल्यापासून बॉलिवूडमधील अनेक कलाकारांना वेगवेगळ्या माध्यमांतून धमक्या मिळाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या घटनांमुळे चित्रपटसृष्टीत चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. एकेकाळी बॉलिवूडमध्ये अंडरवर्ल्डचा असलेला हस्तक्षेप पुन्हा वाढत आहे का? अशा चर्चांनाही यामुळे उधाण आले आहे. दरम्यान, या धमकीमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुंबई पोलीस संपूर्ण प्रकरणाचा तपास करत असून, धमकीमागील सत्य लवकरच समोर येण्याची शक्यता आहे.

एसटीच्या सवलतींसाठी

वंचित राहिले होते. त्यामुळे प्रवाशांना सवलतीपासून मुकावे लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. प्रवासी संघटना, सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही कार्ड सक्तीला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत शासनाने सक्ती पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, राज्यभरात आतापर्यंत सुमारे एक कोटी १० लाख एनसीएमसी स्मार्ट कार्डांची नोंदणी आणि वितरण पूर्ण झाले आहे. उर्वरित पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी एसटी महामंडळ आता प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करणार आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायतींच्या सहकार्याने ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व पात्र महिला व ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मुदतवाढीमुळे ७ नोव्हेंबरपासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत एनसीएमसी कार्ड नसले तरी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पूर्वीप्रमाणेच एसटी प्रवासातील सवलतींचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे ऐन प्रवासात कार्ड नसल्याने निर्माण होणारी अडचण तूर्तास दूर झाली आहे. मात्र, शेवटच्या क्षणी होणारी गर्दी टाळण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी जवळच्या एसटी आगारात किंवा ग्रामपंचायत स्तरावर आयोजित होणाऱ्या शिबिरात जाऊन कार्ड नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन महामंडळाने केले आहे.

भाजपने रडीचा डाव खेळणे बंद करावे; गोकुळच्या सत्तासंघर्षावरून राज ठाकरेंची पोस्ट

मुंबई । प्रतिनिधी

'गोकुळ' दूध संघाच्या निवडणुकीत विरोधकांचे बहुमत असतानाही सत्तेत असलेल्या पक्षांनी डावपेच आखत शासकीय संचालक नेमल्याने यावर तीव्र राजकीय पडसाद उमटले आहेत. गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळावर ५ शासननियुक्त संचालकांची नियुक्ती करण्यासह त्यापैकी चार जणांना मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय महायुतीने घेतला आहे. महायुतीच्या या निर्णयाविरोधात विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

गोकुळ दूध संघ निवडणुकीच्या मुद्द्यावरून आणि सत्ता टिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रणनीतीवर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी निशाणा साधला आहे. बहुमत मिळवता आले नाही म्हणून सत्तेचा गैरवापर करून शासकीय संचालक नेमणे आणि लोकशाहीचा गळा आवळणे चुकीचे आहे, असे म्हणत राज ठाकरे यांनी महायुतीला खडे बोल सुनावले आहे. भाजपमध्ये समजूतदारपणाचा भीषण दुष्काळ असल्याचा टोलाही राज ठाकरेंनी लगावला. लोकशाहीची बूज राखायची खरोखर इतकी इच्छा असेल तर गोकुळ प्रकरणात तुमच्या भाजप पॅनलचे १२ विरोधात सतेज पाटील पॅनलचे १३ जण निवडून आल्यावर लगेच तुम्ही सरकारचे (म्हणजे तुमचेच) ५ संचालक का नेमले आणि त्यांना मतदानाचा अधिकार देऊन काय सिद्ध करताय तुम्ही? ते बॅलेट मतदान पद्धतीने आणि लोकशाही मार्गाने निवडणूक लढवून निवडून आले. तुम्हाला खरंच लोकशाहीची पर्वा किंवा काळजी वाटत असती तर हा असला प्रकार तुम्ही केला नसता. गोकुळवर तुम्हाला सत्ता मिळवता नाही आली म्हणून तुम्ही लगेच तुमची सगळी तत्त्व बाजूला ठेवणार आणि म्हणे लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढणार. सध्या महाराष्ट्रात पाण्याचा भीषण दुष्काळ आणि भारतीय जनता पक्षात समजूतदारपणाचा भीषण दुष्काळ एकाच वेळी कसा यावा, याचेच आश्चर्य वाटते ! सत्तेत असताना ते लोकशाही वाचवा म्हणून मोर्चे काढतील आणि स्वतःच लोकशाहीचा गळा आवळतील. यांच्या काळात अतिरेकी हल्ले झाले, कायदा सुव्यवस्था बिघडली म्हणून दहशतवादापासून देश वाचवा यासाठी मोर्चे काढतील. देशाची अर्थव्यवस्था गाळात गेली आहे म्हणून आता अर्थव्यवस्था वाचवा साठी पण मोर्चे काढतील. भारतीय जनता पक्षाने रडीचा डाव खेळणं बंद करावं. कुठल्या का मार्गाने तुम्ही जे बहुमत मिळवलं ते सर्व विरोधी पक्षांनी १२ वर्षे सहन केलं मग आता विरोधी पक्षांकडे या देशातील जनता झुकायला लागली आहे तर त्यापुढे भाजपाने पण सहन करायला शिकले पाहिजे, असे राज म्हणाले आहेत.

पान ६ वरून...

गेवराई तालुक्यातील दोन

कारवाईला न जुमानता त्यांच्याकडून गुन्हेगारी कारवाया सुरूच होत्या.

त्यांच्या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी पोलीस अधीक्षकांमार्फत जिल्हादंडाधिकाऱ्यांकडे 'एमपीडीए'चा प्रस्ताव पाठवला होता. बीडचे जिल्हादंडाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर, चकलांबा पोलिसांनी ५ नोव्हेंबर रोजी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून ६ नोव्हेंबर रोजी दोन्ही भावांची हर्सूल मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबद्धतेसाठी रवानगी करण्यात आली.

जिल्ह्यात वाळूचा अवैध उपसा व वाहतूक करणारे, गुटखा विक्री करणारे, जातीय वा धार्मिक तेढ निर्माण करणारे, खंडणीखोर, दादागिरी करणारे गुंड तसेच हातभट्टी दारू व जुगार चालवणाऱ्या समाजकंटकांवर यापुढेही 'एमपीडीए' आणि 'मोक्'? अंतर्गत कठोर कारवाई केली जाईल, असा सक्त इशारा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिला आहे.

सदरची धडक कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, माजलगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यात चकलांबा ठाण्याचे सपोनि सचिन इंगळे, पोउपनि गणेश कराडकर, पोलीस अंमलदार सोमनाथ कुलकर्णी, रमेश साळुंके, हनुमान इंगोळे, दासू भोकरे, मुकेश बनसोडे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोउपनि अभिमन्यू औताडे, बबन सलगर आणि बिभीषण चव्हाण यांनी सहभाग घेतला.

पैलवानाच्या पायाची तुटली

एवढा मोठा खर्च करणे खांडेकर कुटुंबाला शक्य नव्हते. त्यांनी ही बाब दिंद्रुड येथील पत्रकार गणेश काटकर यांच्या कानावर घातली. काटकर यांनी ताबडतोब डॉ. ओमप्रकाश शेटे साहेबांना संपर्क करून पैलवानास मदत करण्याची विनंती केली.

डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सुरेश खांडेकर यांना स्वतः मुंबईतील नामांकित रुग्णालयात दाखल करण्यापासून ते दोन्ही शस्त्रक्रिया होईपर्यंतची संपूर्ण व्यवस्था पाहिली. केवळ शब्दांनी नव्हे, तर प्रत्यक्ष आर्थिक मदत आणि वैद्यकीय समन्वयाच्या माध्यमातून त्यांनी पैलवान सुरेश खांडेकर यांच्या कुटुंबाला मोठा आधार दिला. डॉ. शेटे साहेबांच्या या माणुसकीच्या कृतीमुळे आज पैलवान खांडेकर यांच्या दोन्ही शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या असून त्यांची प्रकृती सुधारत आहे. संकटाच्या वेळी एखाद्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच खरी सेवा आहे. पैशांपेक्षा माणुसकी मोठी असते, हे डॉ. शेटे साहेबांनी पुन्हा दाखवून दिले असल्याची भावना ग्रामस्थांची व्यक्त केली. तसेच शेतकरी कुटुंबातील पैलवान सुरेश खांडेकर पुन्हा लवकर बरा होऊन आखाड्यात उतरावा, यासाठी दिंद्रुड परिसरातून सद्भावना व्यक्त होत आहेत.

दिवाळीच्या अनुषंगाने

करण्यात आले आहे.तसेच नागरी उपजीविका अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे १ लाख ३४ हजार ४०० रुपये वेतनही अदा करण्यात आले आहे.सर्वच कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दिवाळीच्या सणापूर्वीच वेतन मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांना सणाचा आनंद साजरा करण्यासाठी आर्थिक मदत झाली आहे. नगरपरिषदेच्या या निर्णयाचे कर्मचारी वर्गातून स्वागत होत आहे. या बद्दल सर्वच कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, स्वच्छता सभापती सौ. प्राजक्ताताई कराड, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते, महिला व बालकल्याण सभापती अंजलीताई माळी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, सर्व नगरसेवक, नगरसेविका यांचे आभार व्यक्त केले आहेत.

नगरपरिषदेवर नवीन नियमक मंडळ आल्यापासून वेतन नियमितच!

परळी वैजनाथ शहराची मध्यवर्ती संस्था असलेल्या नगर परिषदेचे कामकाज हे संपूर्ण समन्वयातून चालवण्याचा प्रयत्न नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली नवीन नियमक मंडळांनी केलेला आहे. शहर विकासाच्या अथक प्रयत्नांबरोबरच प्रशासकीय कामकाजातील सुसूत्रता, नियमितता, पारदर्शकता, सेवा सुविधा, कामकाजात सुलभता आणण्यासाठीही सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. परळी नगर परिषदेवर नवीन नियमक मंडळ आल्यानंतर व नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पदभार घेतल्यापासून आजतागायत कर्मचारी वेतन, दैनंदिन खर्च तजवीज , कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन हे नियमितच आहे. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी १३ मे २०२५ रोजी पदभार स्वीकारल्यानंतर १२ मे २०२६ पर्यंतच्या कालावधीतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ४ कोटी २ लाख रुपये वेतन अदा करण्यात आले. तसेच १३ मे ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील १ कोटी ८५ लाख २२ हजार ५८० रुपये वेतन देण्यात आले आहे. नगरपरिषदेकडून केवळ कंत्राटीच नव्हे, तर कायमस्वरूपी कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि इतर विभागांतील कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनालाही सातत्याने प्राधान्य देण्यात आलेले आहे.

कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच थकीत महागाई भत्ता रक्कमही अदा

याशिवाय, परळी नगरपरिषदेतील कायमस्वरूपी कार्यरत कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही दिवाळीपूर्वी मोठा दिलासा देण्यात आला आहे. या दोन्ही कर्मचारी वर्गाचे ऑक्टोबर २०२६ महिन्याचे वेतन अदा करण्यात आले असून, कर्मचाऱ्यांची प्रलंबित असलेली २४ लाख रुपयांची महागाई भत्त्याची थकबाकीही प्रदान करण्यात आली आहे.एकंदरीतच कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपीव सेवानिवृत्तकर्मचाऱ्यांचेवेतन अदा करण्यात आल्याने परळी नगरपरिषदेकडून सर्वअधिकारी-कर्मचाऱ्यांचीदिवाळीगोड झाली असून या निर्णयाचे कर्मचारी वर्गातून स्वागत होत आहे.

डोंगरपट्ट्यातील विद्यार्थ्यांची

या विद्यार्थ्यांचा सत्कार गटविकास अधिकारी अशोक बाराखते आणि शिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. सत्कारातून विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन व प्रेरणा देण्यात आली.

या यशामध्ये पिंपळ टक्का आणि देवळा येथील शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच पालकांचे मोलाचे योगदान आहे. शिक्षकांनी मनापासून प्रयत्न केले, तर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी शिखरे गाठू शकतात, हे या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा होगाडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक करताना सांगितले की, ''शिक्षकांनी प्रयत्न केले तर विद्यार्थ्यांना कुठपर्यंत पोहोचता येते, हे या यशातून दिसून येते. ग्रामीण भागातील गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.''

या सत्कारप्रसंगी पिंपळ टक्का व देवळा येथील शाळांचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी आणि पालक उपस्थित होते.

ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांच्या यशामुळे वडवणी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

दिवाळीच्या खरेदीसाठी बीडचा

खरेदी बरोबरच पूजेच्या सामानासाठी महिलांनी भाजी मंडई भागात मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या ठिकाणी पोलिसांनी बंदोबस्त लावल्याने काही प्रमाणात का होईना वाहतूक सुरळीत दिसत होती. मात्र तरीही वाहतुकीचे नियम तोडून सैरावैरा पळणाऱ्या वाहन चालकांना आवरता आवरता पोलिसांची दमछाक होत होती .या ठिकाणी शहर वाहतूक शाखेचे पथक तैनात करण्यात आले होते. रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वाहने लागल्याने जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची अडचण होत होती. भाजी मंडई भागात मात्र चार चाकी वाहनांना बंदी होती. या ठिकाणी महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने वारंवार वाहतुकीची कोंडी होत होती. गेल्या तीन चार दिवसापासून शुकशुकाट असलेल्या बाजारात शुक्रवारी मात्र मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने खऱ्या अर्थाने दिवाळीचा माहोल तयार झाला होता. शेतकरी प्रचंड अडचणीत असतानाही भारतीय संस्कृती प्रमाणे सर्वात मोठा सण असलेल्या दिवाळीला काही ना काही खरेदी केली पाहिजे किमान मुलांची समजूत काढली पाहिजे म्हणून शेतकऱ्यांना काटकसर करून का होईना खरेदी करावी लागली.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.७ नोव्हेंबर २०२६
३

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

पाटोदा : येथील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) संचलित, वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने नवगण शिक्षण संस्थेचे सचिव माननीय डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बीड येथील सौ के एस के महाविद्यालयात आयोजित या स्पर्धेसाठी उद्घाटक म्हणून माजी प्राचार्या आणि ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. दीपाताई क्षीरसागर लाभल्या होत्या. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनी अध्यक्षस्थान भूषविले . यावेळी व्यासपीठावर नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे , डॉ. विश्वंभर देशमाने, प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर आणि प्राचार्य डॉ. पंडित खाकरेविराजमान होते, तर वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, डॉ. सोनाजी गायकवाड, पदव्युत्तर विभागाचे संचालक डॉ. गणेश पाचकोरे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल जोगदंड, कार्यालयीन अधीक्षक श्री. चंद्रकांत पवार, पर्यवेक्षक दयानंद सरपते यांची प्रमुख उपस्थिती होती.

इंडियन मेडिकल असोसिएशनचा कला दर्पण सांस्कृतिक महोत्सव

सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती



अंबाजोगाई

इंडियन मेडिकल असोसिएशनचा कला दर्पण सांस्कृतिक महोत्सव सोहळा पिंपरी चिंचवड, पुणे येथे ग.दि.माडगूळकर हॉलमध्ये नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी तर उद्घाटक म्हणून सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्यासह राज्य कोषाध्यक्ष डॉ.अमोल गिते, पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष डॉ.सुधीर भालेराव, डॉ.दिलीप कामत, डॉ.माया भालेराव, डॉ.गितांजली शर्मा, माजी राज्याध्यक्ष डॉ.संतोष कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रास्ताविक करताना स्थानिक अध्यक्ष डॉ.सुधीर भालेराव यांनी इंडियन मेडिकल असोसिएशनचा हा राज्यस्तरीय कला महोत्सव पिंपरी चिंचवड पुणे ब्रांचला दिल्याबद्दल अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी व सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांचे आभार मानले. पिंपरी चिंचवड, पुणे येथील हा कलाकारांचा हा भव्यदिव्य सोहळा डॉक्टर्स मधील कलेबाबत असणारे सुप्त गुण व त्यांच्या अंगातील कलाकारांना त्यांची हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारा ठरला आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी बोलताना आयएमएचे राज्याध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी यांनी गेल्या चार वर्षांपासून डॉ.राजेश इंगोले यांच्या नेतृत्वाखाली सांस्कृतिक समितीने नेत्रदीपक असे काम केलेले आहे. दरवर्षी सांस्कृतिक समिती तर्फे डॉक्टर्स मधील कलाकार जपण्यासाठी आणि त्याला त्याच्या हक्काचे राज्यस्तरीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी डॉ.राजेश इंगोले यांनी सतत चार वर्षे मेहनत घेतली आणि सांस्कृतिक समितीला एका आगळ्यावेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे असे गौरवोद्गार काढले. सांस्कृतिक समितीने डॉ.राजेश इंगोले यांच्या कल्पक नेतृत्वाखाली संघटनेच्या सदस्य डॉक्टरसाठी गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, रिल्स स्पर्धा, मोनोऍक्ट कॉम्पिटिशन, फॅशन शो, काव्य स्पर्धा, कथालेखन स्पर्धा आयोजित करून डॉक्टरांमधील सुप्त कलागुणांना वाव दिल्याचे मत व्यक्त केले. डॉ.राजेश इंगोले यांनी सुरू केलेल्या या कला दर्पण महोत्सव यापुढेही इंडियन मेडिकल असोसिएशन याच ताकतीने पुढे सुरू ठेवेल अशी ग्वाही देत भविष्यात ही आय.एम.ए चा हा सांगितीक महोत्सव कलादर्पण महोत्सव या नावानेच नियमितपणे दरवर्षी आयोजित करण्यात येइल असे आश्वासन दिले. यावेळी बोलताना सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष होत असताना माझ्या मनात एक स्वप्न होते एक संकल्प होता की, महाराष्ट्रातले सर्व डॉक्टर्स एक कलाकार म्हणून एका सांस्कृतिक मंचावर आले पाहिजेत. डॉक्टर हा केवळ डॉक्टर नसतो त्याच्या मध्येही एखादा कलाकार दडलेला असू शकतो तो गायक असू शकतो तो चित्रकार असू शकतो तो उत्कृष्ट फोटोग्राफर असू शकतो तो उत्तम गायक असू शकतो तो उत्तम नर्तक असू शकतो आणि हातात स्टेथोस्कोप आणि लेखणी आल्यानंतर रूग्ण आणि दवाखाना यामध्येच तल्लीन होऊन तो आपल्या जीवनातील इतर भूमिका विसरून जातो. परंतु, यामुळे त्याच्या जीवनामध्ये एक प्रकारची पोकळी निर्माण होते ताण तणाव निर्माण होतात. त्यामुळे डॉक्टरांच्या अंगातील ही कला परत एकदा जिवंत करून हातातला स्टेटस थोडा वेळ बाजूला ठेवून हातामध्ये कुंचला कॅमेरा धरून परत एकदा त्याच्या आयुष्यामधील लपलेल्या कलाकाराला जिवंत करावा हा मानस होता. गेल्या तीन वर्षांमध्ये टीम लीडर म्हणून मी हा उद्देश साध्य करण्यात यशस्वी झालो. दरवर्षी या विविध स्पर्धांमधील डॉक्टरांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे. मला बक्षीस का मिळालं नाही हा सवाल अनेक जण करतात यातच या स्पर्धाचे यश दडलेले आहे. आता इंडियन मेडिकल असोसिएशन मध्ये या सांस्कृतिक स्पर्धा रुजल्या आहेत, वाढल्या आहेत आणि सर्वांना आपल्या हक्काच्या व्यासपीठावर आपल्याला बक्षीस मिळाले पाहिजे हे भावना वृद्धिंगत झालेली आहे हे सांस्कृतिक समितीचे यश आहे असं मी मानतो या शब्दांत स्पर्धांच्या यशस्वितेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावर्षी राज्य उपाध्यक्ष पदाची जबाबदारी मिळाली असल्यामुळे राज्यस्तरीय कार्यबाहूल्य वाढले आहेत. तरी सुद्धा सांस्कृतिक समिती साठी मार्गदर्शक म्हणून मी सदैव उपलब्ध असेल असे सुतोवाच त्यांनी यावेळी केले. सांस्कृतिक समितीचा अध्यक्ष म्हणून काम करत असताना डॉ.जयेश लेले, डॉ.सुहास पिंगळे, डॉ.होजी कपाडिया, डॉ.संजय कदम, संतोष कदम, डॉ संतोष कुलकर्णी, डॉ मंजुषा गिरी, डॉ.अनिल पाचनेकर, डॉ.राजेंद्र कुलकर्णी, डॉ.रवींद्र कुटे, डॉ.अशोक तांबे, डॉ.अनिल आवाड यांच्यासह दिवंगत नेते डॉ.रामकृष्ण लोंढे, डॉ.विक्रम खन्ना यांची खंबीर साथ मिळाल्यामुळे हे अवघड शिवधनुष्य पेलता आलं असे गौरवोद्गार त्यांनी काढले. सांस्कृतिक समितीचे यश हे केवळ माझ्या एकट्याचेच नसून गेलेल्या तीन वर्षांपासून माझ्यासोबत सांस्कृतिक समितीचे विविध सदस्य या स्पर्धा घेण्यासाठी मेहनत करीत होते. या सर्वांच्या परिश्रमाची ही परिणीती आहे असे मी मानतो. या शब्दांत त्यांनी समितीच्या सदस्यांचे आभार व्यक्त केले. यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक स्पर्धांचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरूवात महाराष्ट्राची लोकधारा या अप्रतिम पारंपारिक महाराष्ट्राच्या सांगितीक कार्यक्रमाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समन्वयक डॉ माया भालेराव, डॉ.तुकाराम मुंडे, डॉ.पल्लवी दोडके, डॉ.सुमेध अदुरकर, डॉ.सारिका लोणकर, डॉ.अनिरूद्ध टोणगावकर, डॉ.संजीवकुमार पाटील, डॉ.सुमित लाड, डॉ.शिल्पा क्षीरसागर, डॉ.रूपाली करवा, डॉ.ज्ञानराज चौधरी, डॉ.मोहिनी गानू, डॉ.राजश्री सावंत डॉ.योगेश मुळे, डॉ.सुहास लुंकड, डॉ.ललितकुमार ढोक, डॉ.मंदार डोईफोडे, डॉ.मिलिंद सोनवणे यांनी परिश्रम घेतले. महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ज्योती रेकाटे, डॉ.पुष्कर खैर, डॉ.रूपाली एक्बोटे, डॉ.तनुजा जोशी तर उत्तरार्धाचे सूत्रसंचालन डॉ.अनिरूद्ध टोणगावकर, डॉ.दीपाली टोणगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे नृत्य दिग्दर्शक म्हणून डॉ.शुभांगी टेकूरकर तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन सचिव डॉ.विकास मंडलेचा यांनी मानले.

अरुणा स्वामी यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

कामाप्रती निष्ठा आणि सेवेची वृत्ती प्रेरणादायी-ॲड. डक



माजलगाव। प्रतिनिधी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील लिपिक पदावर कार्यरत असलेल्या सौ. अरुणा बन-स्वामी या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तब्बल ३३ वर्षांच्या प्रदीर्घ, निष्ठापूर्ण आणि समर्पित सेवेनिमित्त त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. बी. आर. डक होते तर यावेळी ज्येष्ठ नेते दयानंदजी स्वामी, प्राचार्य डॉ. अभय सोळंके,उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते आणि उपप्राचार्य पवन शिंदे, प्रबंधक डॉ.प्रशांत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ॲड. बी. आर. डक म्हणाले की, अरुणा स्वामी यांनी आपल्या कामाप्रती असलेल्या निष्ठेतून तब्बल ३३ वर्षे निःस्पृह भावनेने सेवा बजावली. त्यांची कार्यतत्परता, शिस्तप्रियता आणि समर्पणाची वृत्ती महाविद्यालयातील सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचा गौरव करताना मनस्वी समाधान होत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी ज्येष्ठ नेते दयानंदजी स्वामी म्हणाले की, अरुणा स्वामी यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच सामाजिक व राजकीय चळवळीत सक्रीय कार्य करु शकलो असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना सौ. अरुणा बन-स्वामी यांनी महाविद्यालयात प्रदीर्घ काळ सेवा करण्याची संधी मिळाली, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना व्यक्त केली. महाविद्यालयाने केलेला सन्मान आणि प्रदान केलेले गौरवपत्र ही आपल्या सेवाकाळातील अमूल्य शिदोरी असून ती आयुष्यभर जपून ठेवेन, असे त्या म्हणाल्या. प्राचार्य डॉ. अभय सोळंके यांनी अरुणा स्वामी यांच्या शिस्तप्रिय कार्यपद्धतीचे, कर्तव्यनिष्ठेचे आणि जबाबदारीने काम करण्याच्या स्वभावाचे कौतुक केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते, प्रा. उज्ज्वला कदम, प्रा. संजय बागुल आणि प्रा. बबन उदावंत यांनीही मनोगत व्यक्त करून त्यांच्या सेवाकार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैशाली शहाणे यांनी केले, तर आभार प्रा. वैशाली भिसे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीडमध्ये २५ डिसेंबरला शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक शाळा प्रवेश दिनाला १२६ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने नालंदा फाऊंडेशन, बीडच्या वतीने शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा येत्या २५ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी तीन विषय निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये १) कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील शिक्षक : नव्या संधी, नवी आव्हाने' २) 'महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गुरु-शिष्य कार्यात्मक अनुबंध आणि ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यघटना निर्मितीत योगदान या विषयांचा समावेश आहे.

सहभागी शिक्षकांना या तीन विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर ७ ते १० मिनिटांच्या कालावधीत आपले वक्तृत्व सादर करावे लागणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकास १० हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क ५०० रुपये निश्चित करण्यात आले असून, दि. १ नोव्हेंबर ते २२ डिसेंबर २०२६ या कालावधीत नावनोंदणी करता येणार आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व शिक्षकांसाठी आयोजकांच्या वतीने एक वेळ मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर तसेच विद्यापीठस्तरावरील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली नावनोंदणी करावी, असे आवाहन मुख्य संयोजक तथा नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. स्पर्धेच्या नावनोंदणीसाठी व सविस्तर माहितीसाठी ७९९०७६०१५१ आणि ९५६१८१७४७४ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पाटोद्यात पाण्याचा अन् खिशात पैशाचा दुष्काळ

तरीही दिवाळी खरेदीसाठी मुख्य बाजारपेठेत गर्दी! सोयाबीन-ज्वारी वाया गेल्याने शेतकरी हताश

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा शहरात दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर मुख्य बाजारपेठ पूर्णपणे फुलून गेली आहे. सणासुदीच्या खरेदीसाठी नागरिकांची बाजारामध्ये प्रचंड गर्दी पाहायला मिळत असून, दुकाने रंगीबेरंगी आकाशदिवे, मातीच्या पणत्या आणि विविध सजावटीच्या साहित्याने सजली आहेत. एकीकडे बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण दिसत असले, तरी या गर्दीमागे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे आणि कष्टकऱ्यांचे एक वेगळेच विदारक वास्तव लपलेले आहे. खरीप हंगामामध्ये तालुक्यात पावसाने पूर्णपणे दगा दिल्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. पाण्याचा तीव्र दुष्काळ तर आहेच, पण त्यासोबतच शेतकऱ्यांच्या खिशात 'पैशाचा दुष्काळ' देखील प्रकर्षाने जाणवत आहे. खरिपातील मुख्य पीक असलेले सोयाबीन पूर्णपणे वाया गेले असून ते शेतकऱ्यांच्या पदरी पडू शकले नाही. पाऊस नसल्यामुळे पाण्याचे स्त्रोत आटले असून, रब्बी हंगामातील ज्वारीचे पीकही यंदा हातातून गेले आहे.

> ''यंदा पाऊस नसल्याने शेतीतून काहीच उत्पन्न मिळाले नाही. ज्वारी आणि सोयाबीन दोन्ही पिके हातातून गेली. पण सण तर साजरा करावाच लागेल; म्हणून कमीत कमी खर्चात आवश्यक तेवढीच खरेदी करण्यासाठी बाजारात आलो आहोत.''
> -अतुल घोलप स्थानिक शेतकरी, पाटोदा.

पाण्याची आणि पिकांची अवस्था वाईट असल्याने ग्रामीण भागात रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तालुक्यातील अनेक कुटुंबे पोटाची खळगी भरण्यासाठी आणि रोजगाराच्या शोधात बेलापूर व इतर भागांत स्थलांतरित झाली आहेत. गावात परिस्थिती बिकट असतानाही, वर्षभरातून एकदाच येणाऱ्या या मोठ्या सणाचा आनंद टिकवून ठेवण्यासाठी नागरिक आणि शेतकरी उपलब्ध पैशात खरेदी करण्यासाठी बाजारात उतरले आहेत.

आर्थिक चणचण आणि दुष्काळी परिस्थिती असली, तरीही मुलाबाळांच्या आनंदासाठी आणि परंपरेनुसार दिवाळी साजरी करण्यासाठी पाटोदा परिसरातील नागरिक मिळेल त्या उत्पन्नातून खरेदी करत आहेत. कपडे, फटाके, पूजा साहित्य आणि गोडधोडाच्या वस्तूंच्या दुकानांवर ग्राहकांची गर्दी दिसून येत आहे.

मी रमाई "एकपात्री नाटकाचा ४० वा प्रयोग माजलगाव शहरात ऐतिहासिक ठरणार :उबाळे

१ डिसेंबर रोजी प्रयोगाचे आयोजन; फुलेनगर येथील यशोधरा बुद्ध विहारात पार पडली पूर्वतयारी बैठक

माजलगाव। प्रतिनिधी

त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जीवनसंघर्षावर आधारित अत्यंत गाजलेल्या ''मी रमाई'' या एकपात्री नाटकाचा ४० वा प्रयोग माजलगाव शहरात १ डिसेंबर २०२६ रोजी संपन्न होत असून, हा प्रयोग माजलगावच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदवला जाईल, असा ठाम विश्वास प्रख्यात सिनेअभिनेत्री प्रियांकाताई उबाळे यांनी व्यक्त केला. दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी माजलगाव येथील फुलेनगरमधील यशोधरा बुद्ध विहारात ज्येष्ठ आंबेडकरी नेते कचरू तात्या खळगे यांच्या अध्यक्षतेखाली या नाटकाच्या पूर्वतयारी संदर्भात भव्य बैठक पार पडली. सर्वप्रथम पूजनीय भन्ते विवेकानंद व पूजनीय भन्ते शीलानंद यांच्यासह अभिनेत्री प्रियांकाताई उबाळे, आंबेडकरी चळवळीतील नेते दयानंद स्वामी, विजय साळवे,अविनाश जावळे,अंकुश अण्णा जाधव, धम्मानंद साळवे आदी मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध, चक्रवर्ती सम्राट अशोक व बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिव्य मूर्ती व प्रतिमांचे पूजन करण्यात आले. भन्तेजींनी उपस्थित जनसमुदायाला त्रिसरण-पंचशील दिले.



याप्रसंगी नाटकाच्या मुख्य अभिनेत्री प्रियांकाताई उबाळे, निर्माते प्रकाश वाघ व शुद्धोधन शिंदे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शुद्धोधन शिंदे यांनी केले. त्यांनी प्रियांकाताई उबाळे यांच्या कलाक्षेत्रातील संघर्षाचा सविस्तर परिचय करून दिला तसेच माता रमाईंवरील नाटक साकारण्यामागची भूमिका विशद केली. दरम्यान, एकपात्री प्रयोगाच्या निमित्ताने सिनेअभिनेत्री प्रियांकाताई उबाळे व निर्माते प्रकाश वाघ यांनी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांची भेट घेऊन नाट्यप्रयोगाच्या नियोजना संदर्भात सविस्तर चर्चा केली. या वेळी बाबुरावजी पोटभरे यांनी १ डिसेंबर २०२६ रोजी होणाऱ्या 'मी रमाई' या नाट्यप्रयोगास सर्वतोपरी मदत करण्याचे जाहीर केले. तसेच माजलगाव तालुक्यातील सर्व समाज बांधव व भगिनींनी या ऐतिहासिक नाटकास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे जाहीर आवाहनही त्यांनी केले. आपले मनोगत व्यक्त करताना अभिनेत्री प्रियांकाताई उबाळे भावुक झाल्या. त्या म्हणाल्या, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घडवण्यात त्यागमूर्ती रमाईंचा संघर्ष अनन्यसाधारण होता. तब्बल १० वर्षांच्या सखोल संशोधनातून आणि अभ्यासातून हा एकपात्री प्रयोग साकारला आहे. या प्रयोगासाठी ४०४० च्या भव्यदिव्य सेटवर प्रत्यक्ष 'वणंदगाव', 'राजगृह' आणि 'डबकचाळ' साकारण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना विनम्र आदरांजली म्हणून १ डिसेंबर २०२६ रोजी हा ऐतिहासिक प्रयोग माजलगावात होत आहे.

अध्यक्षीय समारोपात कचरू तात्या खळगे यांनी नाटकाच्या प्रयोगास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, ''माता रमाईंचा त्याग घराघरांत पोहोचवणे आपले आद्यकर्तव्य आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील आंबेडकरी समूह प्रियांकाताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून या नाटकास सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.'' या बैठकीत नाटकाचा प्रयोग अत्यंत नियोजनबद्ध, भव्य व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. महिला व तरुणांनी या प्रयोगाचा लाभ घ्यावा यासाठी प्रचार-प्रसाराबाबत अनेक विधायक चर्चा झाल्या. या बैठकीस सद्धम्म सेवा संघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव सर, सचिव गौतम घनघाव सर, कार्याध्यक्ष दशरथ मकासरे, सोपान उजगरे, विजय होळीकट्टी, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष डॉ. भागवत साळवे, त्रिरत्न बौद्ध महासंघाचे नवनाथ शिनगारे सर, लक्ष्मण सहजराव, कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे भारत टाकणखार सर, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. रवींद्र टाकणखार, प्रभाकर साळवे सर, राहुल वाघमारे, कदम साहेब आर्दीसह सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशोधरा बुद्ध विहाराचे सचिव बाबासाहेब जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रभाकर साळवे सर यांनी मानले.

सागर धस यांच्या वाढदिवसानिमित्त

रुग्णांना फळवाटप

उद्योजक अजित पवार व मित्रपरिवाराचा सामाजिक उपक्रम



पिंपळवंडी

सागर धस यांच्या वाढदिवसानिमित्त उद्योजक अजित पवार व मित्रपरिवाराच्या वतीने बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकी जपत रुग्णांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी रुग्णांची आस्थेने विचारपूस करून त्यांना फळांचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी पिंपळवंडीचे उपसरपंच दादासाहेब पवार,देविदास कापसे,अशोक गुजर,भाऊसाहेब जरे,हनुशेठ पवार,भारत मस्के,रामेश्वर खाकरे यांच्यासह सागर धस यांचे समर्थक व मित्र परिवार उपस्थित होते.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य अधिकारी राऊत साहेब व आप्पा येवले यांनी सहकार्य केले.

माती परीक्षणासाठी आता पोस्टाची मदत

शेतकऱ्यांची धावपळ थांबणार; देशातील पहिलाच दिशादर्शक प्रयोग

नांदेड / प्रतिनिधी

शेतीचे उत्पादन वाढवायचे असेल, तर जमिनीचे आरोग्य समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जमिनीत कोणत्या अन्नद्रव्यांची कमतरता आहे, कोणती पिके घेणे योग्य ठरेल आणि कोणत्या खतांची किती मात्रा द्यावी, याचे नियोजन करण्यासाठी माती परीक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. मात्र, मातीचा नमुना तपासणीसाठी पाठवताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. आता भारतीय डाक विभागाने यावर सोपा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

भारतीय डाक विभागाने संस्कृती संवर्धन मंडळाच्या कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी (ता. बिलोली) यांच्या सहकार्याने नांदेडमध्ये हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना मातीचा नमुना थेट आपल्या गावातील पोस्ट कार्यालयात जमा करता येणार आहे. पोस्ट विभागाकडून हा नमुना स्पीड पोस्टच्या माध्यमातून संबंधित प्रयोगशाळेत पाठविला जाणार आहे. देशातील अशा प्रकारचा हा पहिलाच दिशादर्शक प्रयोग असल्याचे सांगण्यात येत आहे. यापूर्वी शेतकऱ्यांना शेतातील मातीचे नमुने घेऊन तालुका किंवा जिल्हास्तरावरील कृषी कार्यालयात जावे लागत होते. त्यानंतर कृषी सहाय्यकांमार्फत हे नमुने संबंधित माती परीक्षण प्रयोगशाळेत पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केली जात होती. यासाठी



शेतकऱ्यांना प्रवास करावा लागत होता. प्रवास आणि इतर खर्च मिळून जवळपास ४०० रुपये खर्च होत होता. अनेकदा अंतर, वेळ आणि खर्च यामुळे काही शेतकरी माती परीक्षण करण्याकडे दुर्लक्ष करतात. परिणामी, जमिनीतील अन्नद्रव्यांची नेमकी स्थिती समजत नाही आणि खतांचा वापरही अंदाजाने केला जातो. नव्या सुविधेमुळे शेतकऱ्यांना तालुका किंवा जिल्ह्याच्या कृषी कार्यालयात जाण्याची आवश्यकता राहणार नाही. गावातील पोस्ट कार्यालयात मातीचा नमुना जमा करून तो प्रयोगशाळेपर्यंत पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या सेवेसाठी शेतकऱ्यांना केवळ १०० रुपये मोजावे लागणार आहेत. त्यामुळे पूर्वीच्या तुलनेत खर्चात मोठी बचत होणार आहे. तसेच प्रवासाचा वेळ वाचणार असून, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनाही माती परीक्षणाची सुविधा अधिक सहजपणे उपलब्ध होऊ शकणार आहे. माती परीक्षणातून जमिनीतील पोषक घटकांची उपलब्धता समजण्यास मदत होते. त्यानुसार पिकांना आवश्यक असलेली खते आणि अन्नद्रव्यांचे नियोजन करता येते. यामुळे अनावश्यक खतांचा वापर टाळणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवणे शक्य होते. त्यामुळे पोस्ट कार्यालयाच्या माध्यमातून मातीचा नमुना प्रयोगशाळेत पाठविण्याची ही सुविधा शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरू शकते. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना माती परीक्षणाच्या प्रक्रियेशी जोडण्यासाठी हा प्रयोग महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे.

डाक विभाग आणि कृषी विज्ञान केंद्राचा पुढाकार

भारतीय डाक विभाग आणि संस्कृती संवर्धन मंडळाचे कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी यांनी एकत्र येत हा उपक्रम सुरू केला आहे. ग्रामीण भागातील पोस्ट कार्यालयांचे जाळे लक्षात घेता ही सेवा शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना गावातूनच मातीचे नमुने प्रयोगशाळेत पाठविणे शक्य होणार आहे. माती परीक्षणाची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा उपक्रम ठरू शकतो.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८६० : अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष म्हणून निवडून आले.
१८८८ : महात्मा गांधींनी कायद्याच्या अभ्यासासाठी लंडन येथे प्रवेश घेतला.
१९१२ : भारत या पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.
१९१३ : दक्षिण आफ्रिकेत भारतीय वंशाच्या खाणकामगारांच्या मोर्चाचे नेतृत्त्व केल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९५४ : मुंबई राज्यात मुंबई वीज मंडळ या दिवशी स्थापन करण्यात आले.
१९९६ : अर्जेंटिनाचे गांधी म्हणून ओळखले जाणारे प्रा. अडोल्फो डी. ओबिएता यांना पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते जमनालाल बजाज आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान.
१९९९ : विकसनशील देशांना जैवतंत्रज्ञानाचा लाभ उपलब्ध करुन दिल्याबद्दल भारताचे वैज्ञानिक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना युनेस्को गांधी सुवर्णपदक जाहीर.
२००१ : संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे महासंचालक डॉ. वासुदेव अत्रे यांना प्रतिष्ठेचा वाय. नायडुम्मा स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२०१२ : बराक ओबामा आणि जो बिडेन यांची दुसर्यांदा अनुक्रमे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.


जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : सॅक्सोफोन या वाद्याचे जनक ॲडोल्फ सॅक्स यांचा जन्म. (मृत्यू: ४ फेब्रुवारी १८९४)
१८३९ : प्राच्यविद्या संशोधक, पहिले भारतीय पुरतत्त्वज्ञ भगवादास इंद्रजी यांचा जन्म.
१८६१ : बास्केटबॉल खेळाचे निर्माते जेम्स नास्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९३९)
१८८० : निसान मोटर कंपनीचे संस्थापक योशूसुका अकावा यांचा जन्म. (मृत्यू: १३ फेब्रुवारी १९६७)
१८९० : कविभूषण बळवंत गणेश खापर्डे यांचा जन्म.
१९०१ : जेष्ठ टीकाकार, समीक्षक विचारवंत श्री. के. क्षीरसागर यांचा जन्म. (मृत्यू: २९ एप्रिल १९८०)
१९१५ : चित्रपट कथाकार, दिगदर्शक दिनकर द. पाटील यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च २००५)
१९२६ : पत्रकार,कथाकार,कादंबरीकार प्रभाकर नारायण पाध्ये उर्फ भाऊ पाध्ये यांचा मुंबई येथे जन्म.
१९२६ : अमेरिकन लेखक झिग झॅगलर यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर २०१२)
१९६८ : याहू चे संस्थापक यारी यांग यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७६१ : मराठेशाहीतील प्रसिद्ध राजकारणी (मराठा साम्राज्यातील ४ थी छत्रपती) महाराणी ताराबाई भोसले यांचे निधन.
१८३६ : फ्रान्सचा राजा चार्ल्स (दहावा) यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १७५७)
१९८५ : प्रसिद्ध अभिनेते संजीवकुमार यांचे निधन. (जन्म: ९ जुलै १९३८)
१९८७ : मराठी रंगभूमीवरील अभिनेते,दिग्दर्शक, लेखक आणि पीडीए (प्रोग्रेसिव डेमॅटिक असोसिएशन) चे संस्थापक प्रा.भालबा केळकर यांचे पुणे इथे निधन. (जन्म: २३ सप्टेंबर १९२०)
१९९२ : संगीत रंगभूमीवरील गायक,अभिनेते जयराम शिलेदार यांचे पुणे इथे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १९१६)
१९९८ : कॉन्टिनेन्टल प्रकाशन चे संस्थापक अनंतराव कुलकर्णी यांचे निधन. (जन्म: १९ सप्टेंबर १९१७)
२००२ : स्वत:च्या सुवाच्च अक्षरात हिंदीत राज्यघटना लिहिणारे वसंत कृष्ण वैद्य यांचे निधन.
२०१० : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांचे निधन. (जन्म: २० ऑक्टोबर १९२०)
२०१३ : भारतीय शेफ तरला दलाल यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९३६)

कपाशीवर स्पोडोप्टेरा अळीचा प्रादुर्भाव वाढला; असे करा व्यवस्थापन



कपाशीच्या पिकावर स्पोडोप्टेरा लिट्युरा (तंबाखूची पाने खाणारी अळी) या किडीचा प्रादुर्भाव वाढत आहे. प्रत्येक जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात कपाशीवर ही कीड आढळून येत असून, या किडीचे वेळीच नियंत्रण न केल्यास उत्पादनात घट येण्याची शक्यता कृषितज्ज्ञांनी वर्तविली आहे. यंदा कपाशीच्या क्षेत्रात घट झाली आहे. वारंवार अतिवृष्टी झाल्याने आधीच शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्च दुप्पट झाला. त्यामुळे खर्चसुद्धा निघेल किंवा नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना आता भेडसावत आहे. बहुतांश भागातील कपाशी पिकावर स्पोडोप्टेरा लिट्युरा (तंबाखूची पाने खाणारी अळी) या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे ही अळी दिवसा पिकावर दिसून येत नाही. मात्र, रात्रीच्या सुमारास पिकाचे नुकसान करते. या किडीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना उपाययोजनाही सुचविल्या आहेत.

अळीमुळे असे होते कपाशीचे नुकसान : या किडीने पुंजक्यात घातलेल्या अंड्यांमधून लहान लहान अळ्या समूहात बाहेर येतात व प्रथमतः त्याच पानातील हरितद्रव्य मागील बाजूने राहून खातात. पाने जाळीदार होतात. या अळ्या नंतर मोठ्या होऊन स्वतंत्रपणे पाने, शेंडे, फुले, पात्या व बोंडे पोखरून खातात. परिणामी, उत्पादनात मोठी घट येते.

असे करा व्यवस्थापन : शेतात हेक्टरी १५ ते २० पक्षी थांबे लावावेत. अंडी व अळीग्रस्त पाने तोडून किडीसह नष्ट करावीत. प्रादुर्भावाच्या सर्वेक्षणाकरिता प्रत्येक किडीसाठी हेक्टरी १० कामगंध सापळे लावावेत. सापळ्यामध्ये प्रति दिन ८ ते १० पतंग २ ते ३ दिवस आढळल्यास नियंत्रणासाठी उपाययोजना करावी. सापळ्यातील अळीचे पतंग रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नष्ट करावेत. याशिवाय आर्थिक नुकसान पातळी (५ टक्के पाते, फुले व बोंडांचे नुकसान) दिसून येताच क्लोरेंट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली प्रति एकर किंवा स्पिनेटोरम ११.७० टक्के एससी २०० मिली प्रति एकर किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी ३७५ मिली प्रति एकर किंवा क्लोरोपायरीफॉस ५० टक्के ईसी सायपरमेथ्रीन ५ टक्के ईसी ४०० मिली प्रति एकर यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.

ऊस तोडणी करताना या गोष्टींची घ्या काळजी; उताऱ्यासह वाढेल उत्पादन



सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये ऊस तोडणी हंगाम जोरात सुरू होत आहे. शेतकरी आपला ऊस कारखान्यांना पाठवण्याच्या तयारीत आहेत. मात्र ऊस तोडणी दरम्यान काही गोष्टींची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असते. अन्यथा ऊस तोडणी दरम्यान केलेल्या चुकांमुळे उसाचे वजन, गुणवत्ता, साखर उतारा यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही तर वेळेआधी किंवा तोडणीस विलंब झाल्यानंतरही तोटा सहन करावा लागू शकतो. यासाठी शेतकऱ्यांनी ऊस तोडणी दरम्यान काही गोष्टींची काळजी घेणे खूप गरजेचे असते. जेणेकरून होणारे नुकसान टाळले जाऊ शकते.

तोडणीची योग्य वेळ साधा : ऊस तोडणीला आला याचे सर्वात मोठे लक्षण म्हणजे उसाची पाने पिवळी पडतात. ज्यामुळे उसाची पूर्ण वाढ झाल्याचे समजले जाते. उसाची पूर्ण वाढ झाल्यानंतर डोळे फुटण्यास सुरुवात होते. ही डोळे येण्यास सुरुवात झाली की तोडणीला सुरुवात करणे आवश्यक असते. तोडणीला आलेल्या उसाचे ब्रिक्स मूल्य हे १८ किंवा त्याहून अधिक असल्यास अशा उसापासून १० ते ११ टक्के साखर उतारा मिळतो. यापेक्षा कमी ब्रिक्स मूल्य असल्यास असा ऊस अपरिपक्व समजला जातो. उसाचे ब्रिक्स मूल्य तुम्ही रेफ्रेक्टोमीटरचा वापर करून मोजू शकतात.

ऊस तोडणीची योग्य पद्धत : वर्षसामान्यपणे महाराष्ट्रात ऊस तोडणी ही कोयता, कुऱ्हाड किंवा काही आधुनिक कटिंग साधने वापरून मजूर पद्धतीने केली जाते. मात्र अशावेळी तोडणीसाठी कुशल मनुष्यबळ असणे आवश्यक असते. उसाची अयोग्य पद्धतीने तोडणी केल्यास वजन आणि साखर उताऱ्यात घट होऊ शकते. उसाच्या रसाची गुणवत्ता देखील खराब होते. याशिवाय अशा उसापासून बेणे तयार केल्यास पुढील वर्षीच्या ऊस उत्पादनाला देखील फटका बसू शकतो. मजूर पद्धतीने ऊस तोडणी ही प्रामुख्याने जमिनीच्या समान पृष्ठभागापासूनच करावी. ऊस तोडणी यंत्रांच्या साहाय्याने केली जात असेल तर उसाचा वरील पानांचा भाग मशीन बाजूला करते आणि जमिनीपासून ते बांडीपर्यंतच्या भागाचे मशीन छोटे तुकडे करते. हे तुकडे हार्वेस्टर बॉक्समध्ये जमा होतात. सामान्यपणे ८ तासात हार्वेस्टर मशीन २.५ ते ४ हेक्टर उसाची तोडणी करते. त्यामुळे ऊस तोडणीची ही आधुनिक पद्धत देखील प्रभावी मानली जाते.

'या' गोष्टींची काळजी घ्या : जमिनीच्या पृष्ठभागापासून ५ सेंमी जरी वरतून तोडणी झाल्यास तुमच्या ऊस उत्पादनात एकरी १.५ ते २ क्विंटलची घट नोंदवली जाऊ शकते. याशिवाय आपण लक्ष न दिल्यास १० सेंमीपर्यंत वरतून ऊस तोडणी झाल्यास एकरी ३ ते ४ क्विंटलचा फटका बसू शकतो. याशिवाय जसे ऊस तोडणी ही अगदी मुळापासून होणे गरजेचे असते. तसेच वरील बांडीच्या भागात देखील जिथपर्यंत कांडी असतात. त्या भागाची देखील योग्य काळजीपूर्वकपणे तोडणी होणे आवश्यक असते.

तोडणीनंतरची काळजी : तोडणीनंतर उसाला जास्त वेळ शेतात ठेवू नये. यामुळे ऊस रसाच्या गुणवत्तेवर परिणाम होऊन उत्पादन घटू शकते. यामुळे साखर उतारा आणि गूळ उत्पादन यावर परिणाम होऊ शकतो. काही कारणास्तव ऊस शेतात पडून राहिल्यास बांडीकडील भाग वापरून उसाच्या मोळ्या झाकून ठेवाव्यात. किंवा मग उसावर शक्य असल्यास पाण्याची फवारणी करावी. या गोष्टींची काळजी घेऊन तुम्ही आपल्या ऊस तोडणी दरम्यान होणारे नुकसान टाळू शकतात.

शेळ्या मेंढ्यातील आंत्रविषार; जाणून घ्या लक्षणे आणि उपचार!



शेळ्या मेंढ्यामध्ये आढळणारा आंत्रविषार हा आजार पावसाळ्यात उगवलेले कोवळे लुसलुशीत गवत भरपूर प्रमाणात खाल्ल्यामुळे या आजाराचा प्रादुर्भाव दिसून येतो. हा आजार सर्व वयोगटातील शेळ्या-मेंढ्यांना होतो. परंतु लहान करडे/कोकरांमध्ये मृत्युदर जास्त दिसून येतो. हा आजार कमी कालावधीचा आहे. प्रादुर्भाव झाल्यापासून दोन ते बारा तासांत मृत्यू होतो. त्यामुळे या आजारावर प्रतिबंधक उपाय करणे फारच गरजेचे आहे. जाणून घेऊया आजाराची लक्षणे आणि त्यावर उपचार.

आंत्रविषार आजाराची लक्षणे : शेळ्या-मेंढ्या निस्तेज दिसतात. एका जागेवर बसून राहतात. दूध पीत नाहीत. पातळ हिरव्या रंगाची संडास करतात. तोंडास फेस येतो, फिट येते. बाधित पिल्ले हवेत उडी मारून जमिनीवर पडतात. मान वाकडी होते. त्यांचा मृत्यू होतो. मोठ्या शेळ्या-मेंढ्या तीव्रतेनुसार काही दिवसांपर्यंत आजारी राहतात.

फऱ्यामध्ये ताप येणे, तोंडातून फेस येणे, अडखळत चालणे, तोल जाणे, गोल फिरणे, चक्कर येणे तसेच श्वसनास त्रास होणे इत्यादी लक्षणे दिसतात. शेवटच्या टप्यात पोटफुगी, जुलाब ही लक्षणे आढळून येतात. पोट फुगल्यामुळे जनावर उठबस करतात. सारखे पाय झाडतात.

आंत्रविषार आजारावर उपचार : हा अल्प मुदतीचा आजार असल्यामुळे प्रभावी उपचार करणे शक्य होत नाही. यासाठी अधिक खर्चसुद्धा होतो. पशुवैद्यकाच्या सहाय्याने विशिष्ट प्रतिजैविके दिल्यास पोटातील विष शोषण्याचे प्रमाण कमी होते, जीवाणूंची वाढ थांबते. कळपातील मरतुक कमी होऊ शकते. एखादे लिव्हर टॉनिक व शिरेवाटे ग्लुकोज दिल्यास फायदा होऊ शकतो. प्रथमोपचार म्हणून लहान पिलांना हगवण सुरू झाल्यानंतर मिठाचे पाणी किंवा इलेक्ट्रोलाईट्सचे द्रावण पाजावे. आजारास प्रतिबंध करणे, अत्यंत सोपे, कमी खर्चाचे, व प्रभावी मध्यम आहे. मुख्यता लसीकरण व आहारातील व्यवस्थापन करून या आजाराचा प्रादुर्भाव टाळता येतो.

चिया सीड लागवडीतून शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्नाची संधी!

चिया, किंवा मेक्सिकन चिया, हे भारतीय शेतकऱ्यांसाठी नवीन पीक असले तरी पोषक घटकांनी समृद्ध या बियाण्यांचे आहारातील महत्व यामुळे चिया बियाण्यांची लोकप्रियता वेगाने वाढत आहे. चिया लागवडीतून शेतकऱ्यांना खर्चापेक्षा दुप्पट उत्पन्न मिळू शकते. पोषक तत्वांनी समृद्ध, चिया पिकाला अत्यंत कमी देखभाल लागते. हे पीक रोग व किडीपासून मुक्त राहते, त्यामुळे चिया लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसानाची चिंता करण्याची गरज नाही. सध्या भारतात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, राजस्थान आणि हरियाणामध्ये या पिकाची शास्त्रोक्त पद्धतीने लागवड केली जात आहे. सेंद्रिय पद्धतीने या पिकाची लागवड करणे उत्पन्नाच्या दृष्टीने उत्तम असते.

चिया पिकाच्या लागवडीतील महत्वाचे मुद्दे : चिया हे पीक मध्यम सुपीक आणि चांगल्या निचऱ्याच्या जमिनीत सहज उगवते या पिकात आम्लीय माती मोठ्या प्रमाणात सहन करण्याची क्षमता आहे. परंतु अधिक क्षारयुक्त जमिनीत पिकाचे उत्पादन कमी होते. चांगल्या उत्पादनासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वात योग्य आहे. भारतात चिया पेरणीसाठी सर्वोत्तम काळ ५ ते २५ ऑक्टोबर पर्यंत आहे. पेरणीच्या वेळी, २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान बियांच्या चांगल्या उगवणासाठी सर्वात योग्य आहे. हे पीक थंडीसाठी अत्यंत संवेदनशील असले तरी, डिसेंबर आणि



जानेवारी महिन्याची थंडी या पिकासाठी पोषक आहे. शेत तयार करण्यासाठी खोल नांगरणी व एक कुळवणी पुरेशी आहे. पेरणीसाठी चांगल्या प्रतिचे बियाणे वापरावे. प्रामुख्याने चिया बियाण्यांचे काळे आणि पांढरे असे दोन प्रकार आहेत. २.५ ते ३ किलोग्रॅम बियाणे प्रति एकर लागवडीसाठी पुरेसे आहेत. चियाची पेरणी सीड ड्रिल किंवा पेरणी यंत्राने करता येते. पेरणीच्या वेळी दोन ओळीतील अंतर ३० ते ४५ सें.मी. व रोपातील अंतर ३० सेमी अंतर ठेवावे. चिया पिकाचे योग्य पोषण होऊन चांगले उत्पादन मिळविण्यासाठी हेक्टरी १०-१५ टन चांगले कुजलेले शेणखत जमीन तयार करतांना द्यावे. हलक्या जमिनीत पेरणीच्या वेळी २०-३० किलो नत्र, २०-२५ किलो स्फुरद आणि १५-२० किलो पोटॅश प्रति हेक्टरी देणे झाडांच्या आवश्यक वाढीसाठी फायदेशीर ठरते. गरजेनुसार १० किलो नत्र प्रति हेक्टरी पेरणीनंतर ३०-४५ दिवसांनी द्यावे. बियाणे अंकुरित होण्याच्या काळात मातीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. वालुकामय किंवा वालुकामय चिकणमाती जमिनीत पेरणी केल्यानंतर साधारणपणे ४-५ वेळा पाणी द्यावे लागते. परंतु चिया पीक पक्व होण्याच्या कालावधीत पिकाला पाणी देऊ नये. या पिकाला तणांचा आणि किडी व रोगांचा त्रास होत नाही तरी सुरुवातीला २५ ते ३० दिवस शेत तणमुक्त ठेवावे. चिया हे पीक थंडीसाठी जास्त संवेदनशील असल्यामुळे जास्त थंडीत जमिनीला हलके सिंचित करणे फायद्याचे ठरते. चिया पीक १२०-१३० दिवसांत काढणीसाठी तयार होते. यावेळी पिकाची सर्व पाने गळून पडतात. पिकाची काढणी हिवाळ्यातच, म्हणजे झाडे सुप्त अवस्थेत असतांना करावी. पिकाची कापणी विळ्याने किंवा मशीनने करता येते. त्यानंतर लाकडी काठीने मळणी करावी. चियाचे प्रति एकर सरासरी उत्पादन ३५०-४०० किलो बियाणे एवढे येते. शेतकऱ्यांना चिया पिकाच्या लागवडीतून भरघोस उत्पन्न मिळू शकते. गरज आहे फक्त या पिकाचे शास्त्रोक्त पद्धतीने लागवड करण्याची.

शिक्षक भरतीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर!

पवित्र पोर्टलद्वारे नियमित शिक्षक भरती करण्याची जोरदार मागणी

जालना। प्रतिनिधी

राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांची हजारो पदे रिक्त असताना नियमित शिक्षक भरती करण्याऐवजी 'विषय सहाय्यक' पदे उसनवारी तत्त्वावर भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याने शिक्षण क्षेत्रात नव्या वादाला तोंड फुटले आहे. शासनाच्या या निर्णयाला मराठवाडा शिक्षक संघाने तीव्र विरोध दर्शविला असून, हा निर्णय तातडीने रद्द करून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून नियमित शिक्षकांची पारदर्शक भरती करावी, अशी मागणी प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आली आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या २८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार विषय सहाय्यक पदे उसनवारी तत्त्वावर भरण्याची निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी .. या संकेतस्थळावर 'विषय सहाय्यक निवड प्रक्रिया' ही लिंक



उपलब्ध करून देण्यात आली असून, २८ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

मात्र, या निर्णयामुळे नियमित शिक्षक भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या पात्र बेरोजगार तरुणांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. शिक्षक होण्यासाठी डी.एड., बी.एड. यांसारखी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता पूर्ण करणे, तसेच शिक्षक पात्रता परीक्षा () उत्तीर्ण होणे अशा अटी शासनाकडून घालण्यात आल्या आहेत. या सर्व पात्रता पूर्ण करूनही हजारो तरुण नोकरीच्या प्रतीक्षेत असताना त्यांना नियमित नियुक्ती देण्याऐवजी उसनवारी तत्त्वावर पदे भरण्याचा मार्ग स्वीकारणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तर शिक्षकांअभावी शैक्षणिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. एका बाजूला पात्रताधारक बेरोजगार तरुण नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत, तर दुसऱ्या बाजूला रिक्त पदांमुळे शाळांमधील शैक्षणिक व्यवस्था प्रभावित होत आहे. अशा परिस्थितीत उसनवारी तत्त्वावरील नियुक्ती हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही, अशी भूमिका शिक्षक संघटनेने मांडली आहे.

शिक्षकांची नियमित भरती करण्याऐवजी उसनवारीची पद्धत रूढ करणे म्हणजे शिक्षण व्यवस्थेच्या स्थैर्याशी तडजोड करण्यासारखे आहे. शासनाने एकीकडे शिक्षक होण्यासाठी उच्च शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेचे निकष लावायचे आणि दुसरीकडे सर्व पात्रता पूर्ण केलेले तरुण बेरोजगार असताना तात्पुरत्या स्वरूपात पदे भरायची, ही विसंगती असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. मराठवाडा शिक्षक संघाने विषय सहाय्यक पदे उसनवारी तत्त्वावर भरण्याबाबतचा निर्णय तातडीने रद्द करावा, पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षकांची नियमित व पारदर्शक भरती प्रक्रिया राबवावी, राज्यातील सर्व रिक्त शिक्षक पदे पात्रताधारक बेरोजगार तरुणांमधून भरावीत आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशा मागण्या केल्या आहेत. शिक्षक भरतीचा प्रश्न केवळ बेरोजगार तरुणांच्या नोकरीपुरता मर्यादित नसून तो राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित आहे. त्यामुळे शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन उसनवारीच्या निर्णयाचा फेरविचार करावा, अन्यथा शिक्षण क्षेत्रात असंतोष आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे शासनाकडे ही मागणी केली आहे. ''राज्यात हजारो शिक्षकांची पदे रिक्त असताना डी.एड., बी.एड. व टीईटीसारख्या आवश्यक पात्रता पूर्ण केलेले तरुण नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. अशा परिस्थितीत नियमित शिक्षक भरती करण्याऐवजी उसनवारी तत्त्वावर विषय सहाय्यकांची पदे भरणे योग्य नाही. यामुळे पात्रताधारक बेरोजगार तरुणांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने नियमित शिक्षक भरती करावी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कायमस्वरूपी शिक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे.

बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळा-महाविद्यालयात अभियान

परभणी। प्रतिनिधी

बालकांवरील अत्याचार, लैंगिक अन्यायाच्या घटनांना आळा घालण्यासाठी आता विद्यार्थ्यांनाच त्यांच्या सुरक्षिततेविषयी जागरूक करण्यावर भर दिला जात आहे. या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे परभणी व हिंगोली या दोन्ही जिल्ह्यांत सुरक्षित बचपण अभियान राबविण्यात येत आहे.



याअंतर्गत आतापर्यंत ६५ हून अधिक शाळा, महाविद्यालये व वसतिगृहांत जनजागृतीपर कार्यक्रम घेतले. गुड टच-बॅड टचमधील फरक, पोक्सो कायद्याचे संरक्षण, स्वसंरक्षणाचे महत्त्व व संकट वेळी मदत मिळविण्याचे मार्ग याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होत आहे. शोषण, बालहक्कांचे उल्लंघन व पण महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबईच्या निर्देशानुसार राज्यभर अभियानाची अंमलबजावणी होत आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष आर. एम. सादराणी यांच्या मार्गदर्शनात परभणी व हिंगोली जिल्ह्यांत विविध शैक्षणिक संस्थांत उपक्रम राबविण्यात येत आहे. बालकांना केवळ शिक्षणच नव्हे, तर सुरक्षित वातावरण, त्यांच्या हक्कांची जाणीव होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. बालवयातच मुला-मुलींना स्वतःच्या शरीराविषयी सजगता, वैयक्तिक सुरक्षितता व कायदेशीर अधिकारांची माहिती मिळावी, हा प्रमुख हेतू आहे. बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गुड टच-बॅड टच हा विषय अभियानात प्राधान्याने हाताळण्यात येत आहे. योग्य आणि अयोग्य स्पर्शातील फरक विद्यार्थ्यांना उदाहरणांसह समजावून सांगण्यात येत आहे. कोणत्याही व्यक्तीकडून अनुचित स्पर्श किंवा गैरवर्तन झाल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. भीतीपोटी ही बाब लपवून न ठेवता तत्काळ पालक, शिक्षक किंवा विश्वासातील व्यक्तीला सांगावी, असे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. संशयास्पद परिस्थिती ओळखणे, प्रसंगावधान राखणे व अडचणीच्या वेळी मदत मागण्याचे धाडस दाखविणे, यावरही विशेष भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना केवळ कायद्याची माहिती देण्यापुरते हे अभियान मर्यादित नसून, प्रत्यक्ष जीवनात संकटाचा सामना करण्याची मानसिक तयारी निर्माण करण्यावरही भर देण्यात येत आहे. बालकांचे संरक्षण ही केवळ शासन, पोलीस किंवा न्यायव्यवस्थेची जबाबदारी नाही. कुटुंब, शाळा, शिक्षक, पालक व समाजातील प्रत्येक घटकाने ती स्वीकारणे आवश्यक आहे. मुलांना आपल्या अडचणी मोकळेपणाने सांगता येतील, असे विश्वासाचे वातावरण निर्माण करणे काळाची गरज आहे. अभियानातून विद्यार्थ्यांत जागरूकता निर्माण करण्यासह पालक, शिक्षक व समाजालाही बालसंरक्षण जबाबदारीची जाणीव करून दिली जात आहे. बालकांच्या सुरक्षिततेसाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) भूषण काळे यांनी केले. पोक्सो कायद्याचे कवच : बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम अर्थात पोक्सो कायद्याची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत देण्यात येत आहे. बालकांवरील लैंगिक अत्याचार घटनांना प्रतिबंधासाठी कायद्यातील तरतुदी, पीडित बालकांना मिळणारे संरक्षण, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया व कायदेशीर मदतीसाठी उपलब्ध यंत्रणेबाबत मार्गदर्शन होत आहे. अत्याचाराची घटना घडल्यानंतर बदनामीच्या भीतीने किंवा दबावामुळे गप्प राहणे थोकादायक ठरू शकते. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडल्यास ती विश्वासातील व्यक्तीला सांगणे व संबंधित यंत्रणांची मदत घेणे आवश्यक आहे.

घरफोडीतील दीड लाखाचे दागिने जप्त

परभणी। प्रतिनिधी

जिल्ह्यात घरफोडीच्या घटनांमध्ये सहभागी असलेल्या गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांनी विशेष मोहीम हाती घेतली असताना स्थानिक गुन्हे शाखेने पूर्णा येथील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत मोठी कामगिरी केली. गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून पोलिसांनी एका २१ वर्षीय तरुणासह १७ वर्षीय विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून घरफोडीतील तब्बल १ लाख ४७ हजार ७०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले. या प्रकरणातील अन्य दोन साथीदार फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडणाऱ्या घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास करून ते उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमावत यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. अपर पोलीस अधीक्षक चिखले आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पथक संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. दरम्यान, ४ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. पूर्णा शहरातील उड्डाणपुलाजवळील मोकळ्या जागेत एका पालाजवळ दोन संशयित इसम थांबले असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पथकाने परिसरात सापळा रचून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या संशयितांकडे पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता पूर्णा ठाण्यात दाखल घरफोडीच्या गुन्ह्यात त्यांचा सहभाग असल्याचे समोर आले. आरोपींनी अन्य साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडून गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले. या प्रकरणी पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या कारवाईत चरण किसना ऊर्फ बशा शिंदे ऊर्फ पवार (वय २१, रा. आदिलाबाद, तेलंगणा) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्यासोबत एका १७ वर्षीय विधी संघर्षित बालकालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

या गुन्ह्यात सहभागी असल्याचा संशय असलेले रघु ऊर्फ रड्या शास्त्री भोसले (रा. पूर्णा) आणि कटप्पा ऊर्फ शीला हनुमंत भोसले (रा. वरणा तांडा, बोरी, ता. जिंतूर) हे दोघे अद्याप फरार आहेत. या कारवाईत पोलिसांनी एकूण १ लाख ४७ हजार ७०० रुपयांचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त केला. घरफोडीच्या गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत झाल्याने तपासाला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली. फरार आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर या गुन्ह्यातील इतर बाबी स्पष्ट होण्याची शक्यता आहे. तसेच या संशयितांचा अन्य घरफोडीच्या घटनांमध्ये सहभाग आहे का, याचाही तपास पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक मधुकर चट्टे, अंमलदार सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, केशव लटपटे, लक्ष्मण कांगणे, रंगनाथ दुधाटे, गजानन क्षीरसागर, हनुमान ढगे, विलास बहुरे यांच्या पथकाने केली. जिल्ह्यातील घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने सुरू केलेल्या विशेष मोहिमेला या कारवाईमुळे यश मिळाले आहे. फरार आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास पूर्णा पोलीस करीत आहेत.

शेतकऱ्यांची दिवाळी गोड; विलास कारखान्याकडून ऊस बिलाचे पैसे जमा

लातूर

मांजरा परिवारातील विलास सहकारी साखर कारखान्याच्या निवळी आणि तोंडार (उदगीर) येथील दोन्ही कारखान्यांनी गाळप झालेल्या उसाचा प्रतिटन तीन हजार रुपयांप्रमाणे पहिला हप्ता दिवाळीपूर्वीच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केला आहे. दोन्ही कारखान्यांकडून एकूण ३३ कोटी ३८ लाख ९३ हजार रुपयांची रक्कम वितरित करण्यात आल्याने शेतकऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे.

मांजरा परिवारातील कारखाने यंदाच्या गाळप हंगामात उसाला प्रतिटन तीन हजार रुपये पहिली उचल देणार असल्याची घोषणा सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केली होती. गाळप हंगामाच्या शुभारंभप्रसंगी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनीही या घोषणेनुसार मराठवाड्यात सर्वाधिक ऊसदर देण्याची ग्वाही दिली होती. विलास सहकारी साखर कारखाना, वैशालीनगर, निवळीच्या वतीने १६ कोटी ८ लाख ९३ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत. या कारखान्याचे आतापर्यंत १४ दिवसांत ७३ हजार ९७० मेट्रिक टन उसाचे गाळप झाले असून, ६१ हजार ६६० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. कारखान्याचा साखर उतारा ८.५० टक्के आहे. विलास सहकारी साखर कारखाना, तोंडार (उदगीर) यांच्या वतीने १७ कोटी ३० लाख रुपये पहिला हप्ता म्हणून जमा करण्यात आले आहेत. या कारखान्याने १९ दिवसांत ७३ हजार २८० मेट्रिक टन उसाचे गाळप केले असून, ६३ हजार ४०० क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. कारखान्याचा साखर उतारा ८.८५७ टक्के आहे. ज्या शेतकऱ्यांचा ऊस कारखान्याकडे गाळपासाठी आला आहे, त्यांनी संबंधित बँक शाखेतून बिलाची रक्कम उचल करून घ्यावी, तसेच जास्तीत जास्त ऊस विलास कारखान्याला पुरवठा करावा, असे आवाहन चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, व्हाइस चेअरमन माजी आ. वैजनाथराव शिंदे, संचालक मंडळ आणि कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी केले आहे. दरम्यान आ. अमित देशमुख यांनी सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या असून विक्रमी गाळप साध्य करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर मिळवून देण्यासाठी सर्वांनी कारखान्याला जास्तीत जास्त ऊस पुरवठा करून सहकार्य करावे, असे आवाहनही केले आहे.

पैनगंगा बंधाऱ्याचे ९० टक्के काम पूर्ण; किनवट-उमरखेडच्या सीमावर्ती गावांना मोठा दिलासा

नांदेड। प्रतिनिधी

किनवट शहरासह उमरखेड तालुक्याच्या सीमावर्ती भागातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पैनगंगा नदीवरील नवनिर्मित उच्च पातळी बंधाऱ्याचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. परतीचा पाऊस झाल्यास बंधाऱ्याला गेट बसवून पाणी अडविण्याची तयारी करण्यात येणार आहे. त्यामुळे किनवट-उमरखेड या दोन्ही तालुक्यांतील नदीकाठच्या गावांसह पैनगंगा अभयारण्यातील दुर्गम शेतशिवारांना आगामी काळात मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.



उमरखेड तालुक्याच्या सीमेवर, किनवट शहरालगत पैनगंगा नदीवर तब्बल २०२ कोटी रुपये खर्चून १३ गेटचा उच्च पातळी बंधारा उभारण्यात येत आहे. सध्या गर्डरवर स्लॅब टाकण्याचे काम शिल्लक असून, ते पूर्ण करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. बंधाऱ्याला प्रत्येकी १२ मीटर रुंदीची व सात मीटर उंचीची १३ गेट बसविण्यात येणार आहेत. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे १०.५७ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध होणार आहे. १ हजार ५७० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे किनवट शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत होणार असून, उमरखेड व किनवट तालुक्यांतील दुष्काळग्रस्त गावांनाही रब्बी व उन्हाळी हंगामात सिंचनाची सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. विशेष म्हणजे, भूमिपूजनानंतर अवघ्या २४० दिवसांत रात्रंदिवस काम करून प्रकल्प अंतिम टप्प्यात आणण्यात आला आहे. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन सरकारने धरणे व बंधाऱ्यांमध्ये पाणी अडविण्यासंदर्भातील काही अटी शिथिल केल्याने यंदा बंधाऱ्यात पाणीसाठा करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पैनगंगा नदीचा हा भाग किनवट व उमरखेड तालुक्यांच्या सीमेला जोडणारा आहे. नदीकाठचा मोठा परिसर पैनगंगा अभयारण्याच्या प्रभावक्षेत्रात येतो. या भागातील अनेक गावे व शेतशिवार दुर्गम आहे. पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न दरवर्षी गंभीर बनतो. बंधाऱ्यात पाणी साठल्यास नदीकाठच्या शेतजमिनींना सिंचनाचा आधार मिळण्याबरोबरच या दुर्गम गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नालाही काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. त्यामुळे हा प्रकल्प केवळ किनवट शहरापुरता मर्यादित न राहता उमरखेडच्या सीमावर्ती भागासाठीही महत्त्वाचा ठरणार आहे. यंदा हिवाळ्याच्या सुरुवातीलाच पैनगंगा नदीचे पात्र कोरडे पडल्याने पाणीटंचाईची चिंता वाढली आहे. अशा परिस्थितीत बंधाऱ्याचे उर्वरित काम वेळेत पूर्ण होऊन परतीच्या पावसाचे पाणी अडविणे शक्य झाल्यास दोन्ही तालुक्यांतील नागरिक आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले होते. त्यानंतर गोदावरी पाटबंधारे विभागाच्या देखरेखीखाली कामाला गती देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथील कार्यकारी संचालक जयंत गवळी, अधीक्षक अभियंता सुदाकर कचकलवार आणि कार्यकारी अभियंता प्रसाद लांब यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता पंकज गावंडे व कनिष्ठ अभियंता शिवशंकर डाखोरे हे कामाची प्रगती व गुणवत्ता यावर लक्ष ठेवून आहेत.

दोन्ही तालुक्यांच्या विकासाला चालना

पैनगंगा उच्च पातळी बंधारा हा किनवट तालुक्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. त्याचा थेट लाभ उमरखेडच्या सीमावर्ती भागालाही होणार आहे. सिंचन, पिण्याचे पाणी आणि जलसंधारणाच्यादृष्टीने या प्रकल्पाचे महत्त्व मोठे आहे. बंधाऱ्याचे काम गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शेतकरी, नागरिक तसेच दोन्ही तालुक्यांच्या सीमावर्ती भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास आमदार भीमराव केराम व आमदार किसनराव वानखेडे यांनी व्यक्त केला.

तुळजापूर तालुक्यात शेतकऱ्याने परत केली पाच हजारांची दुष्काळी मदत



तुळजापूर । प्रतिनिधी

शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलेली पाच हजार रुपयांची अग्रीम मदत तुळजापूर तालुक्यातील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते गोपाळ सुरवसे यांनी शासनाला साभार परत केली. तुळजापूर तहसील कार्यालयात तहसीलदारांच्या प्रतिनिधीकडे लेखी निवेदनासह ही रक्कम परत करण्यात आली.

जिल्हा परिषद सदस्य प्रतीक्षा गोपाळ सुरवसे यांचे पती गोपाळ सुरवसे यांनी शेतकऱ्यांना देण्यात आलेली पाच हजार रुपयांची मदत अत्यंत तुटपुंजी असल्याचे सांगितले. या रकमेतून शेतकऱ्यांची दिवाळी साजरी होणे शक्य नाही. त्यामुळे 'ही रक्कम तुम्हीच ठेवा आणि याच पैशातून दिवाळी साजरी करा,' असा संदेश देत त्यांनी मदत परत केली. गोपाळ सुरवसे हे तालुक्यातील प्रगतशील शेतकरी असून सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. शेतकऱ्यांना स्वतंत्र विद्युत डीपी मिळवून देणे, गरजू एकल महिलांना शिलाई मशीन उपलब्ध करून देणे, युवकांना क्रीडा साहित्य देणे तसेच शेतमजुरांना रोजगार मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीच्या तुलनेत भरीव मदत मिळणे अपेक्षित होते. मात्र, शासनाने केवळ पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देऊन शेतकऱ्यांची निराशा केली आहे, अशी प्रतिक्रिया सुरवसे यांनी व्यक्त केली. यावेळी शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष जगन्नाथ गवळी, हरीश जाधव, सुरेश कोकरे, ज्ञानेश्वर मुळे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

दैनिक
राज्य लोकतंत्र
शनिवार दि.०७ नोव्हेंबर २०२६ | ६

पवनचक्की कंपन्यांची पोलिस व महसूल प्रशासनाच्या पाठबळावर शेतकऱ्यांवर दडपशाही सुरूच!

लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष, शेतकरी हतबल!मावेजा मागणाऱ्या शेतकऱ्यांना गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर दडपशाही सुरूच असून, पोलिस आणि महसूल प्रशासनाच्या भूमिकेमुळे शेतकरी हतबल झाले आहेत. शेतजमिनीतून अवजड साहित्याची वाहतूक करताना शेतकऱ्यांची परवानगी न घेणे, मोबदला न देणे आणि मावेजाची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना धमकावणे असे प्रकार घडत असल्याचे समोर येत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार निवेदने देऊन आणि आंदोलनाच्या माध्यमातून पाठपुरावा करूनही जिल्हा प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने पवनचक्की कंपन्यांची पाठराखण केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

मावेजाची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देऊन दहशत निर्माण केली जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिस आणि महसूल प्रशासनाने कंपन्यांच्या दबावाखाली काम न करता शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. बीड तालुक्यातील बालाघाटावरील कानडीघाट येथे दि.२८ ऑक्टोबर रोजी सकाळी साडे १० वाजता टोरंटो ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीसाठी अवजड साहित्याची वाहतूक करण्यात येत होती. विक्रम आश्रुबा झोडगे, गणेश देविदास झोडगे, रामचंद्र झोडगे, सुनील लिंबाजीराव झोगडे, बारीक गवळी,



वाल्मिक गवळी आणि धनंजय गवळी या शेतकऱ्यांच्या शेतातून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता तसेच मोबदला न देता वाहतूक केली जात असल्याचा आरोप आहे.याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी विचारणा करून मावेजाची मागणी केली असता, पवनचक्की कंपनीशी संबंधित काही व्यक्तींनी शिवीगाळ केली तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकीकडे शेतकऱ्यांच्या जमिनी आणि शेतरस्त्यांचा वापर करून पवनचक्की प्रकल्पांची उभारणी केली जात असताना दुसरीकडे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या मोबदल्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. लोकप्रतिनिधींनीही या गंभीर प्रश्नाकडे पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांनी न्याय मागायचा कोणाकडे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्य घेऊन कार्य करणाऱ्या पोलिस प्रशासनाची प्रतिमा अशा घटनांमुळे मलिन होत आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून त्यांना धमकावणाऱ्या पवनचक्की कंपन्यांच्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय आणि नियमानुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण न करता त्यांच्या शेतजमिनीतून वाहतूक होणार नाही, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

डोंगरपट्ट्यातील विद्यार्थ्यांची अंतराळ भरारी!

तीन विद्यार्थ्यांची नासा व इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी निवड

वडवणी । प्रतिनिधी

सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असताना यश मिळवणे तुलनेने सोपे असते. मात्र, ग्रामीण भागात अत्यंत मर्यादित सोयी-सुविधांमध्ये मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेत आपल्या गुणवत्तेची चमक दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांचे खरोखरच कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील विद्यार्थ्यांनी हे सिद्ध करून दाखवले आहे.



पिंपळ टक्का येथील इयत्ता आठवीचा विद्यार्थी श्रेयस दादा भाऊ कदम याची नासाच्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे. त्याच गावातील श्रावणी हनुमंत कदम या विद्यार्थिनीची इस्रोच्या राष्ट्रीय शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली असून, देवळा येथील संस्कृती सुनील कदम या विद्यार्थिनीनेही इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी निवड मिळवली आहे.

या तिन्ही विद्यार्थ्यांनी केंद्रीय व जिल्हास्तरावर आयोजित परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवून हा मान संपादन केला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल वडवणी पोलीस आणि शिक्षण विभागाच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात आले. ◀◀ पान २ वर





दिवाळीच्या खरेदीसाठी बीडचा बाजार फुलला; मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने सुभाष रोडवर वाहतुकीची कोंडी

बीड । प्रतिनिधी

तीन चार दिवसाच्या प्रतिक्षेनंतर शुक्रवारी बीडचा बाजार ग्राहकांनी फुलला . कर्मचाऱ्यांचे पगार आणि शेतकऱ्यांना अनुदान मिळाल्याने दिवाळीच्या खरेदीसाठी सुभाष रोड आणि भाजी मंडई भागात ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. विशेषता महिलांची गर्दी प्रचंड होती. गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी होत असतांना पोलिसांची मात्र दमछाक होत होती.

बीड जिल्ह्यामध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे आणि शेतकऱ्यांकडे कुठल्याच मालाचे पैसे नसल्याने गुरुवारपर्यंत बाजारात शुकशुकाट होता. मात्र सरकारी कर्मचारी आणि इतरांचे पगार मिळाल्याने आणि शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपयांची मदत पडल्याने नागरिकांनी खरेदीसाठी सुभाष रोड भागात गर्दी केली होती. सायंकाळी पाचच्या सुमारास कपडे व इतर वस्तूंच्या ◀◀ पान २ वर

पैलवानाच्या पायाची तुटली नस, गरीबी पुढे संकट मोठे

देवदूतासारखे धावून आले डॉ. ओमप्रकाश शेटे

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या जवळा येथील शेतकरीपुत्र, आखाडा गाजवणारे युवा पैलवान सुरेश खांडेकर यांच्या आयुष्यात अचानक मोठे संकट आले. सरावादरम्यान त्यांच्या पायाची मुख्य नस तुटली आणि दोन पायांवर उभे राहणेही अवघड झाले. उपचाराअभावी पैलवानाचे कुस्तीतील भविष्य अंधारात जाण्याची भीती होती. मात्र आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र



समितीचे अध्यक्ष, गोरगरिबांचे देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे साहेब यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता मदतीचा हात पुढे केला.

याबाबत अधिक वृत्त असे की, धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथील पैलवान सुरेश खांडेकर यांच्या पायाला सरावादरम्यान मोठी इजा झाली. दुखापत इतकी गंभीर होती की एकाच पायावर दोन मोठ्या



शस्त्रक्रिया करणे गरजेचे होते. तसेच उपचारासाठी मुंबईतील नामांकित रुग्णालयात जावे लागणार होते, पण गरिबीच्या परिस्थितीत ◀◀ पान २ वर

दिवाळीच्या अनुषंगाने नगरपरिषदेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन आणि महागाई भत्ता अदा

नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या पुढाकारातून कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

ना पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगर परिषदेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन दिवाळीपूर्वीच अदा करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांची मदिवाळी गोड झाली आहे. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पदभार स्वीकारल्यापासून कंत्राटीसह सर्वच कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्यावर भर दिलेला असून दिवाळीच्या अनुषंगानेही दिवाळीपूर्वीच हातात पैसे यावे या दृष्टिकोनातून वेतनाची रक्कम अदा



करण्यात आली आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्याचे ३२ लाख ३४ हजार रुपये वेतन अदा करण्यात आले आहे. तसेच वसुली, अग्निशमन आणि विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचेही वेतन दिवाळीपूर्वीच देण्यात आले आहे. यामध्ये वसुली विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ३८ हजार ७६८ रुपये, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ८७ हजार ५७२ रुपये आणि विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ६८ हजार ८६३ रुपये वेतन, पाणीपुरवठा ५ लक्ष ७६ हजार ८२८ रुपये, जेसीबी ऑपरेटर ४७००० रुपये वेतन अदा ◀◀ पान २ वर



पिंपळवंडी:-दिपावली वसुबारस सणानिमित्त गोमातेची पुजा करताना पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.ए.एस.मोहळकर,डॉ.कृष्णा खटावकर,सेवक ज्ञानेश्वर पठारे (फौजी), गोपालक योगेश पवार,निखिल पवार व गांवकरी

गेवराई तालुक्यातील दोन सराईत गुंडांना दणका जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची कडक कारवाई

वाळू चोरी, खुनाचा प्रयत्न, दंगल आणि सरकारी कामात अडथळा आणणारे दोन भाऊ जेरबंद

बीड /चकलांबा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गुळज येथील कायदा व सुव्यवस्थेला वारंवार आव्हान देणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांवर जिल्हा प्रशासनाने 'एमपीडीए' कायद्यान्वये कठोर कारवाई केली आहे. किशोर शहादेव पवार (वय ३२) आणि हनुमान शहादेव पवार (वय ३५, दोघे रा. गुळज, ता. गेवराई) अशी स्थानबद्ध करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून, त्यांची छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

गंभीर गुन्ह्यांची मोठी पार्श्वभूमी

चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या किशोर पवार याच्यावर ७, तर हनुमान पवार याच्यावर ९ गंभीर गुन्हे दाखल





आहेत. यामध्ये प्रामुख्याने गौण खनिज वाळूची अवैध चोरी करणे, खुनाचा प्रयत्न करणे, जीवे मारण्याच्या धमक्या देणे, गंभीर दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवून दंगल घडवणे, सरकारी नोकरावर हल्ला करणे, पुरावा नष्ट करणे तसेच जातिवाचक शिवीगाळ करणे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. यापूर्वी ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्यावर कलम १२९ बीएनएसएस अंतर्गत प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती; मात्र त्या ◀◀ पान २ वर

श्री खंडोबा दीपमाळ मंदिराकडे जाणाऱ्या खिंडीतील नव्या रस्त्यालगत खोदकामाचा घाव!

एअरटेल कंपनीकडून कथित विनापरवाना खोदकाम; रस्ता खचण्याची भीती, प्रशासनाच्या परवानगीचा प्रश्न ऐरणीवर

बीड । प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक श्री खंडोबा दीपमाळ मंदिराकडे जाणारा खिंडीतील रस्ता अनेक वर्षांच्या मागणी आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत नुकताच तयार करण्यात आला आहे. मात्र, या रस्त्याच्या एका बाजूला नालीचे काम अद्याप अपूर्ण असतानाच एअरटेल कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून रस्त्यालगत खोदकाम करून केबल टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, सदर खोदकामासाठी संबंधित विभागाची आवश्यक परवानगी घेण्यात आली आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता खोदकाम करण्यात आले असल्यास ही बाब गंभीर असून, नव्याने झालेल्या रस्त्याच्या मजबुतीला धोका निर्माण होऊ शकतो.

अनेक वर्षांपासून नागरिकांची मागणी आणि लोकप्रतिनिधींसह सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे हा रस्ता प्रत्यक्षात साकार झाला आहे. अशा परिस्थितीत खासगी कंपनीच्या केबल टाकण्याच्या





कामामुळे रस्त्याच्या कडेला खोदकाम होऊन मातीची पकड कमकुवत होणे, रस्ता खचणे तसेच भविष्यात रस्त्याचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातच रस्त्याच्या एका बाजूचे नालीचे काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने या खोदकामामुळे पावसाळ्यात पाणी साचणे आणि रस्त्याची अधिक हानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज!

संबंधित कंपनीने खोदकामासाठी परवानगी घेतली आहे का, खोदकाम करताना रस्त्याच्या सुरक्षेचे निकष पाळले आहेत का आणि झालेल्या नुकसानीची जबाबदारी कोणाची, याची संबंधित नगरपालिका व सार्वजनिक बांधकाम यंत्रणेने चौकशी करणे आवश्यक आहे. तसेच खोदकामामुळे रस्त्याचे नुकसान झाले असल्यास ते संबंधित कंपनीकडून पूर्ववत करून घेण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. वर्षानुवर्षांच्या पाठपुराव्यानंतर रस्ता तयार होतो आणि खासगी कंपन्यांच्या खोदकामामुळे त्याची वाट लागणार असेल, तर अशा कामांवर नियंत्रण ठेवणार कोण? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26